‘ १७ अमेरिकनांना घेऊन जायला सातव्या आरमारातील काही बोटी निघाल्या आहेत’ असं समजायला सारेच काही दूधखुळे नव्हते...



# माणूस

१ जानेवारी १९७२

पन्नास पैसे

| | | | |
|---|---|---|---|
| माणूस | शनिवार | १ जानेवारी १९७२ | पन्नास पैसे |
| वर्ष | अंक | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| अकरा | एकतीस | पंचवीस रुपये | पासष्ट रुपये |

# माणूस

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**सप्रेम नमस्कार...**

□ भारतातील संसदीय लोकशाहीने पाकिस्तानातील हुकुमशाहीचा आज पराभव केला आहे. याबद्दल आपल्या सर्वांना सार्थ आनंद व अभिमान वाटतो.

या संदर्भात मनातील एक व्यथा व्यक्त करण्याकरिता मी हे पत्र लिहीत आहे. पाकिस्तानच्या तुलनेने भारतामध्ये माणूसकीची, समतेची व न्यायाची भावना जास्त खोलवर रुजलेली आहे. म्हणूनच आपली सुरक्षा व संरक्षण दृढ करून त्या आधारे आपण पाकिस्तानवर मात करू शकलो हे उघड आहे. अन्यथा देशात अंधळा राष्ट्रवाद व युद्धज्वर वाढून आपण फसलो असतो.

अशावेळी ज्या लोकशाही श्रद्धांचा, व मूल्यांचा आपण गौरव करतो त्याचा अवलंब राष्ट्रीय जीवनाच्या सर्व क्षेत्रात जाणतेपणाने व खंबीरपणाने आपण करतो आहोत की नाहीत हे तपासून पाहाणे हाही युद्धसाहाय्याचा भाग आहे असेच समजले पाहिजे

या दृष्टीने पाहाता श्री. अनिल बर्वे व श्री. पायगुडे यांनी गेले ८–९ महिने साधा लोकशाही न्याय मिळवून देण्याच्या बाबतीत आपण सर्वांनी जी उदासिनता दाखविली आहे त्याचा विषाद वाटतो. याचा अर्थ श्री. बर्वे (व श्री. पायगुडे) यांचो मते व कार्यक्रम आपण मान्य केला पाहिजे किंवा त्याबद्दल सहानुती दाखवीली पाहिजे असा नव्हे. मला त्यांचे एकही मत मान्य नाही. त्यांचे भारतीय परिस्थितीचे निदान व विश्लेषण चुकीचे आहे. हे स्पष्ट आहे. पण ते नक्षलवादी किंवा तत्सम कोणी आहेत. व कालची–आजची राजकीय हवा त्यांना प्रतिकूल आहे. म्हणून जर त्यांना लोकशाहीतील नागरिकांना घटनेनुसार मिळणारे मूलभूत अधिकार व व संरक्षण नाकारले गेले तर ती आपल्या लोकशाहीची आत्मघातकी चूक ठरेल.

प्रा. रा. म. बापट, पुणे

दि. २७ डिसेंबर १९७१

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

अरुण गोसावी

# मुंबई वार्ता

## युद्धज्वर ओसरला, आता निवडणूक-ज्वर चढू लागले

युद्ध संपले. ब्लॅक आऊट उठला. मुंबई पुन्हा पूर्ववत चमकू लागली आहे. खिडक्यांच्या तावदानावरील खाकी कागद आता निघू लागले आहेत. लोकल गाड्यामध्ये, बसेसमध्ये आता पुरेसा उजेड पडू लागला आहे. नाईट-क्लब्स् पुनश्च धंदा करू लागले आहेत. सिनेमा-नाटकवाल्यांचे नष्टचर्य संपले. सगळे कसे पूर्ववत सुरू झाले आहे. एवढेच काय आता निवडणुकीच्या मारामाऱ्याही सुरू झाल्या आहेत. लढाई संपली. आपणही आता वादावादीत भाग घ्यायला हरकत नाही.

तीन डिसेंबरच्या रात्रीच ब्लॅक आऊट बसला. त्या रात्री फारशी कुणाला माहिती नसल्याने जोराचा ब्लॅक आऊट नव्हता. पण दुसऱ्या दिवसापासून खराखुरा काळोख सुरू झाला. राष्ट्रप्रेमी लोकांच्या उत्साहाला उधाण आले. पोरेसोरे, प्रौढ, रस्तोरस्ती काठ्या, दगडे घेऊन हिंडू लागले आणि कुठल्या खिडकीतून अंधुक प्रकाशाचा अस्पष्ट जरी संशय येत असला तर हाणले दगड. ज्या खिडकीतून उजेड येतो आहे त्याच खिडकीवर दगड बसेल असे नाही. मोटारीवर दगड बसू लागले. टॅक्सीवाल्यांनी रात्रीचा धंदा बंद केला. गाडीवाले संध्याकाळच्या आत घरोघर परतू लागले. रात्री मुंबईतून हिंडणे म्हणजे महाभयानक संकट. ज्यांना खरोखरच अत्यावश्यक कामे होती, असेच लोक जीव मुठीत घेऊन हिंडू लागले.

असे का व्हावे? खरे म्हणजे ब्लॅक आऊटमुळे सुरळीत जीवनावर परिणाम व्हायला नको. उत्पादनाची पातळी वाढायला हवी. एवढा संपूर्ण ब्लॅक आऊट करण्याची गरज असते काय? ब्लॅक आऊटच्या नियमाप्रमाणे प्रकाशाचे किरण बाहेर रस्त्यावर पडायला नकोत किंवा सरळ किरण कुठूनही दिसायला नकोत. खिडकीच्या काचेला गडद कागद लावूनही बाहेर जो अंधुक प्रकाश दिसतो तो नियमामध्ये बसतो. हवाई हल्ला सूचक भोंगा वाजताच हा दिवा घालविला की झाले. परंतु रस्त्यावरचे लोक एवढाही दिवा सहन करीत नव्हते.

ज्या नागरी संरक्षण समित्या स्थापन झाल्या त्या जवळ जवळ अकार्यक्षम होत्या. राजकीय दृष्टिकोनातून या समित्यांवर माणसे नेमली होती. साधारण प्रौढ किंवा म्हातारे-कोतारे. तरुणांवर जवळ जवळ बहिष्कार. ब्लॅक आऊट म्हणजे काय याचीही पुरेशी माहिती या समित्यांना होती किंवा नाही कुणास ठाऊक. ब्लॅक

आऊटच्या काळात या समित्या कुठेच बाहेर दिसायच्या नाहीत. त्यामुळे ब्लॅक, आऊट नीट होतो की नाही हे पाहण्याची जबाबदारी अर्थातच सर्व उत्साही तरूणांवर. या तरुणांना जर समित्यांमध्ये घेतले असते आणि ब्लॅक आऊटची पूर्ण माहिती त्यांना दिली असती तर एवढी गडबड झाली नसती.

रस्त्यांवरील पूर्ण काळोखही आवश्यक होता काय हा प्रश्न आहे. रस्त्यावरचे दिवे जर मंद केले असते तर शहरातला सर्व व्यवहार सुरळीत सुरू राहिला असता. हवाई हल्ल्याचा भोंगा वाजताच हे दिवे बंद करायचे. पण मुंबईची दिवे लावण्याची अथवा विझविण्याची पद्धत मोठी चमत्कारिक आहे. युद्ध सुरू होण्यापूर्वी ब्लॅक आऊटच्या तालमीच्या वेळा ठरविण्यासाठी सचिवालयात नागरी संरक्षण समितीची बैठक भरली होती. हवाई दलाचे प्रतिनिधीही या बैठकीला हजर होते. त्यांच्यापैकी एका अधिकाऱ्याने प्रश्न विचारला की हवाई हल्ल्याचा इशारा मिळताच रस्त्यावरचे दिवे किती वेळात बंद होऊ शकतील ? महानगरपालिकेच्या एका अधिकाऱ्याने जरा वेळ विचार करून उत्तर दिले—कमीत कमी तीन तास—! जमलेल्या बऱ्याच लोकांच्या तोंडाला फेस आला. ब्लॅक आऊटच्या तालमीच्या दिवशी रस्त्यावरचे दिवे लावायचेच नाहीत असा त्याच क्षणी निर्णय घेण्यात आला. त्यामुळे युद्धाच्या काळात रस्त्यावरचे दिवे कधीच लावले गेले नाहीत.

मुंबईत रस्त्यावरचे दिवे एका ठिकाणाहून लागत नाही. अनेक ठिकाणी या दिव्यांची बटने आहेत आणि त्या त्या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन दिवे लावावे लागतात. म्हणून हा गोंधळ. सर्व दिवे एकदम लावण्याची व्यवस्था असती तर हा प्रसंग आला नसता.

भोंग्यांच्या बाबतीतही गोंधळ. सुरुवातीला हवाई हल्ला सूचक भोंगा आणि सबठीकचा भोंगा यांच्यात फरकच कळत नव्हता. वेळी अवेळी कोणताही भोंगा व्हायचा. ज्या वेळी पाकिस्तानी विमानांच्या स्वागतासाठी मुंबईतल्या विमानवेधी तोफा आग ओकू लागल्या त्या काळात चार वेळा निरनिराळ्या प्रकारचे भोंगे झाले. अजूनही मधेच कुठला तरी भोंगा सूर काढून जातो. भोंगे नीट ऐकू येत नाहीत. ही तर सर्वांचीच तक्रार. नागरी संरक्षणाच्या बाबतीत केवढा हा गलथानपणा.

आता संरक्षण निधीबाबत. यावेळी सरळ पैसे न घेता अल्पबचतीत पैसे गुंतविण्याची पद्धत सुरू केली हे बरे झाले. अजून १९६२ च्या वेळचा तर सोडाच पण दुसऱ्या महायुद्धाच्या वेळच्या संरक्षण निधीचा हिशेब व्यवस्थित यायचा आहे असे लोक सांगतात. त्या दृष्टीने अल्पबचतीत पैसा गुंतवण्याची पद्धत योग्यच आहे. पण समाजविरोधी लोक कोणत्याही परिस्थितीत स्वतःची पोळी भाजून काढायला मागेपुढे पाहत नाहीत. अल्पबचतीच्या बाबतीतही काही तक्रारी येत आहेतच. अनेक तथाकथित समाजसेवक आणि राजकीय पुढारी या योजनेचा गैरफायदा घेत असल्याच्या तक्रारी आहेत.

हे पुढारी आपल्यातर्फे गुंतवणूक झाली आहे हे दाखविण्यासाठी एजंटांची नेमणूक करतात. आणि एजंट मधल्यामध्ये स्वतःचे कमिशन उकळतात. काही ठिकाणी गरीब शिक्षकांना एकदम मोठमोठ्या रकमा अल्पबचतीत गुंतविण्यास सांगण्यात येते. त्यांच्याजवळ पैसे नसल्याने त्यासाठी बँकेकडून कर्ज देण्यात येते. म्हणजे या कर्जाचे व्याज त्या शिक्षकांवर. शिवाय कर्ज मिळवून देणारा एजंट मधल्या मधे कमिशन उपटणार ते वेगळेच. अशा प्रकारचे व्यवहार रत्नागिरी जिल्ह्यात होत असल्याच्या तक्रारी आल्या आहेत. हाच कित्ता इतरही जिल्ह्यात गिरविला जात असणार. पैसे भरणारे बिचारे राष्ट्राचा विचार करून पोटाला खार लावतात आणि हे समाजकंटक देशातील आणीबाणीच्या परिस्थितीचा असा फायदा घेतात. सरकारने याबाबतीत त्वरित काही तरी केले पाहिजे.

मोठ मोठे उद्योगपती, कारखानदार वगैरे लोक आता मोठ्या रकमा निधीला देऊ लागले हे योग्यच आहे. बऱ्याच ठिकाणी कामगारांनी दिलेला पैसा मालकाच्या नावावर जातो आणि मालक भाव खाऊन जातो. एकेक दिवस जादा काम करून अनेक कारखान्यातले कामगार या जादा कामाचे पगार संरक्षण निधीला देणार आहेत. या जादा कामातून जे जादा उत्पादन होणार आहे त्यातून मिळणारा जादा नफा मालक लोक निधीला देणार आहेत काय हे अजून स्पष्ट झालेले नाही.

युद्ध सुरू झाल्याबरोबर जनतेत अमाप उत्साह निर्माण झाला. व्यापारी-कारखानदारातही नवे राष्ट्रीय वारे संचारले. असेच कारखानदारांच्या एका पार्टीला जाण्याचा प्रसंग आला. सर्वजण इंदिरा गांधींची स्तुती करीत होते. आणि म्हणत होते, युद्ध प्रयत्नात आम्हालाही सहभागी व्हायचे आहे. आम्हाला अधिक लायसेन्सेस मिळाली पाहिजेत, निर्बंध उठविले पाहिजेत, उद्योगधंद्यांना आता मुक्तद्वार मिळाले पाहिजे वगैरे. या आकांक्षा निश्चितच प्रशंसनीय आहेत. परंतु त्यांच्या मागे आपले खिसे भरण्याचे मनोरथ नसले म्हणजे झाले. युद्ध सुरू व्हायच्या एक आठवडा आधीपासून विजेऱ्यांचे सेल्स विक्रीसाठी दुकानदारांकडे येतच नव्हते. कारखानदारांकडूनच सेल्स् येत नाहीत असे दुकानदार सांगत होते हे कशाचे लक्षण आहे ?

युद्ध म्हणजे पुन्हा नेत्यांचा सुकाळ. ब्लॅक आऊटच्या दगडफेकींच्या वेळी घरात बसणारे स्थानिक नेते आता संरक्षण निधी कोण जास्त मिळवून देतो या अहमहमिकेने मिरवणुका काढून हिंडू लागले आहेत. स्वतःच जास्त पैसे मिळवून दिले असे दाखविण्याचे प्रयत्नही होऊ लागले आहेत. एकंदर ठीक आहे. पण या स्पर्धेतून गलिच्छ राजकारण वगळायला हवे याचे तारतम्य बऱ्याच जणांना राहात नाही. एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप होतात, चिखलफेक होते आणि वातावरण बिघडते.

धोबी तलाव संरक्षण समितीचा उपयोग करून डॉ. शांती पटेल स्वतःचे वजन वाढवून घेत आहेत असा आरोप नुकताच या समितीचे चिटणीस श्री. सुरेंद्र मोदी

यांनी केला आणि आपल्या पदाचा राजीनामा दिला. डॉ. पटेल समितीच्या संमतीशिवाय मिरवणुका काढतात, पैसे गोळा करतात, स्वतःच्या सहीने पत्रके काढतात आणि बेशिस्त वर्तन करतात वगैरे वगैरे आरोप त्यांनी केले. अर्थात या आरोपांचा डॉ. पटेल यांनी इन्कार केला आणि दुःख व्यक्त केले. पण असल्या वैयक्तिक मारामाऱ्या सर्वत्रच चालू आहेत. वरची उघडयावर आली एवढेच.

इकडे राज्य विधानसभेच्या निवडणुका मार्च ५, ७ व ९ या तारखांना घेण्याचे घाटत आहे. युद्धज्वर संपत आला. आता निवडणूक ज्वर भरू लागेल. विरोधी पक्षांना तर नुसताच ज्वर भरण्याची शक्यता अधिक आहे. युद्धानंतर नवकाँग्रेसचा भाव आणखीनच वाढला आहे यात शंका नाही. आता विरोधी पक्षांचे पवित्रे काय राहतात ते बघायचे.

महाराष्ट्र काँग्रेस समितीची बैठक पुन्हा दोन जानेवारीला भरणार आहे. सीलिंगचा प्रश्न आणि निवडणुका हेच विषय अर्थातच चर्चेला येणार आहेत. तिकीट वाटपाची जत्रा जानेवारी दहा तारखेपासून मुंबई क्षेत्री भरणार आहे. अखिल महाराष्ट्रातील भाविक काँग्रेसजन त्यावेळी मुंबईत इंदिरानामाचा गजर करीत जमतील यात शंका नाही.

महाराष्ट्र जनसंघाने १५० जागा लढविण्याचे ठरविले आहे. जनसंघाची कार्यकारी समिती नागपुरात जानेवारी १ व २ रोजी भरणार असून त्यावेळी पक्षाचा जाहीरनामा तयार होईल आणि उमेदवारांची यादीही तयार होईल. सोशालिस्ट पार्टीचा खरे म्हणजे महाराष्ट्रात आता फारसा ठावठिकाणा उरलेला नाही. पण सर्व जागा लढविणार असल्याचे त्या पक्षाच्या चिटणीसांनी परवाच एका सभेत सांगितले. संयुक्त आघाडी केल्याशिवाय विरोधी पक्षांना सर्व जागा लढविणे शहाणपणाचे ठरणार नाही. निदानपक्षी जागांच्या वाटपाबाबत तरी विरोधी पक्षांनी निश्चितच देवाण घेवाण करायला हवी. नाहीतर मनावर तावीच्या पूर्व किनाऱ्यावर पाकिस्तानने जसे डोके आपटून घेतले तसे विरोधी पक्ष इंदिरा काँग्रेसच्या भक्कम फळीवर डोके आपटून नुसतेच रक्तबंबाळ होतील. अद्याप तरी विरोधी पक्षांनी आपापसात बोलणी सुरू केलेली नाहीत. पण बोलणी करण्याशिवाय गत्यंतर नाही. जाणार कुठे.

दरम्यान शेतकरी कामगार पक्षाने आपण ९० जागा लढविणार असल्याचे जाहीर केले आहे. त्याचबरोबर जागा वाटपाबाबत दोन्ही कम्युनिस्ट पक्ष, समाजवादी पक्ष आणि रिपब्लिकन पक्ष यांच्याशी बोलणी करण्याची तयारीही दाखविली आहे.

निवडणुका पुढे ढकलणे खरे म्हणजे विरोधी पक्षांना सोयीचे होते. नुकत्याच मिळविलेल्या विजयामुळे इंदिराबाईंच्या लोकप्रियतेने नवे शिखर गाठले आहे. नवी

पृष्ठ ५६ वर

# सातवा आरमारी काफिला

प्रतिनिधी

भारत-पाक युद्ध अगदी ऐन रंगात आलं होतं. छांबबद्दल जरी सर्वांना चिंता वाटत होती, तरी इतर विभागातील भारताची आगेकूच नेत्रदीपकच होती. भारतीय नौसेनेने पाक आरमाराचे पेकाटच मोडले, तर वायुसेनेने पाकचे हवाईदल व रणगाडा पथकांचा खातमा केला होता. सर्वांचे डोळे लागले होते ते ढाक्का विजयाकडे पण ढाक्का विजयाला अपेक्षेपेक्षा थोडा अधिक विलंब लागला होता. त्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे ढाक्क्यातील परदेशी नागरिक व मुत्सद्दी यांना तेथून सुखरूपपणे बाहेर पडता यावे म्हणून व संयुक्त राष्ट्र संघाच्या विमानांना निर्धास्तपणे फेऱ्या मारता याव्यात म्हणून काही तासांकरिता आपली मोहिम थांबविण्यात आली होती. संयुक्त राष्ट्रांच्या विमानातून इतर सर्व नागरिक सुखरुप ढाक्क्याबाहेर पडले. विमानाच्या शेवटच्या फेरीत काही जागा रिकाम्या होत्या पण त्यातून प्रवास करायला काही अमेरिकनांनी नकार दिला आणि ह्या मूठभर अमेरिकनांना (म्हणजे १७ अमेरिकनांना) तेथून 'सुखरुप घेऊन जाण्याकरिता' निक्सन प्रशासनाने पश्चिम प्रशांत महासागरात असलेल्या अमेरिकेच्या सातव्या आरमारी काफिल्यातील काही बोटींना चित्तगावकडे जाण्याचा हुकूम दिला. १७ अमेरिकनांना घेऊन जायला सातव्या आरमारातील काही बोटी निघाल्या आहेत असं समजायला सारेच काही दुधखुळे नव्हते. कोंडीत सापडलेल्या पाक सैन्याची व्यवस्था लावण्यासाठी व भारतावर दडपण आणण्यासाठी असा हुकूम देण्यात आला होता हे कळायला कोणालाही वेळ लागला नाही. अनेकांना सातवे आरमार म्हणजे काय याची माहितीही नव्हती, पण या प्रसंगाने सातवे आरमार साऱ्यांच्या परिचयाचे झाले. आता काय होणार? चीन-पाक-अमेरिका एकत्र येणार का? या दबावापुढे

भारतीय प्रधानमंत्री दबणार का ? रशियाचा पवित्रा काय राहील असे अनेक प्रश्न विचारण्यात येऊ लागले. अस्वस्थता वाढू लागली. यातच भर म्हणून चिनी हालचालींची आवईही उठत होती.

दक्षिण व्हिएटनाम, लाओस, कंबोडिया, थाललंड या इंडोचायनातील देशांना साम्यवादी हस्तक्षेपापासून रक्षण करण्याच्या उद्देशाने टोन्किनच्या आखातात, फिलिपिन्सच्या बेटांवरील तळावर सातव्या आरमारी काफिल्यांचे वास्तव्य असते. टोन्किनच्या आखातापासून चित्तगाव बंदर सुमारे साडेचार हजार मैल दूर आहे. म्हणजे तेथून चित्तगावकडे यायला अंदाजे पाच एक दिवस जरूर लागले असते सातव्या आरमारी काफिल्यात निरनिराळ्या प्रकारच्या १२५ नौका आहेत. यात यु. एस्. एस् एंटरप्राईज धरून पाच विमानवाहू नौका. त्यांवर ६५० विमाने आहेत. या विमानवाहू नौकांतही हल्ला करायला उपयोगी पडणाऱ्या खास नौकांचा व पाणबुडी वाहू नौकेचा समावेश आहे. या काफिल्यात काही साध्या पाणबुड्या आहेत तर अणुशक्तीवर चालणाऱ्या पाणबुड्यांचे एक पथक आहे. या पाणबुड्यांचा तळ फिलिपिन्सची राजधानी मनिला येथे आहे. काही आण्विक पाणबुड्यांवर अस्टर अणु टॉर्पेडोज् आहेत. ' पॅसिफिक जनरल कमांड ' खाली हा सातवा आरमारी काफिला येतो आणि त्याचे मुख्य केंद्र पर्ल हार्बर येथे आहे.

अशा या सातव्या काफिल्यातील काही बोटींचा ' टास्क फोर्स ' टोन्किनच्या. आखातातून निघाला. त्यात जगातील सर्वात मोठी विमानवाहू नौका ' यु. एस्. एस् एंटरप्राईज 'चा समावेश होता. ही विमानवाहू नौका ९९ हजार टनांची असून अणुशक्ती निर्माण करणाऱ्या आठ भट्ट्यांवर ती चालते. या भट्ट्यांना पाच वर्षे इंधन घ्यावे लागत नाही. एवढ्या इंधनावर ती २० वेळा पृथ्वीप्रदक्षिणा करू शकते.

भारताची विमानवाहू नौका विक्रांतपेक्षा ही नौका दहापटीने मोठी आहे. ही नौका म्हणजे एक भले मोठे तरते गावच. कारण यावर ४०० अधिकारी व ४२६० इतर नौसैनिक आहेत. त्यांच्यासाठी साऱ्या सोई उपलब्ध आहेत. या नौकेचा वेग ताशी ३३ सागरी मैल आहे. हा वेग प्रचंडच आहे. कारण सर्वसाधारणपणे जहाजांचा वेग १५ ते २० नॉटस्. (सागरी मैल) असतो. जहाजावर सुमारे १०० विमानांचा तांडा आहे. यात स्कायहॉकसारखी बडी विमाने आहेत. १९६५ साली हे अजस्त्र धुड सातव्या आरमारी काफिल्यात सामील झाले. व्हिएतनामी युद्धात तिने फार मोठी कामगिरी बजावली आहे. ' टास्क फोर्स 'मधील दुसऱ्या बोटीत ' ट्रिपोली ' या एका विमानवाहू नौकेचाही समावेश होता त्यावर लढाऊ हेलिकॉप्टर्सची पथके आणि ८०० नौसैनिक होते. याशिवाय सात विनाशिका व फ्रिगेटस् आणि त्यांना तेलपुरवठा करणारे एक तेलवाहू जहाज म्हणजे एकूण दहा जहाजे होती. यात काही पाणबुड्यांचा समावेश होता का याबद्दलची काहीच बातमी नाही पण या मोहिमेला

पृष्ठ ४९ वर

# पाकिस्तान मोडले, पुढे काय ?

**वि. शं. पारगांवकर**

सुरू झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत भारत-पाक युद्ध समाप्त झाले. या खेपेचे युद्ध निर्णायक झाले ही अत्यंत समाधानाची गोष्ट आहे आणि दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे या युद्धात लष्करी आणि मुत्सेद्दिगिरीतील विजय हातात हात घालून मिरवले. अशी गोष्ट भारताच्या बाबतीत बावीस वर्षांनंतर आज प्रथमच घडली. म्हणून तिचे सर्व श्रेय पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनाच आहे. सर्व गोष्टी आहेत तशा असूनही खंबीर नेता काय करू शकतो याचे इंदिरा गांधी एक उत्कृष्ट उदाहरण आहेत. नाहीतर जगजीवन बाबू आणि यशवंतराव चव्हाण गेली कित्येक वर्षे केंद्रीय मंत्रिमंडळात आहेतच !

पाकिस्तानचा पराभव आणि बंगला देशाची निर्मिती या दोन्ही गोष्टी या उपखंडात लक्षणीय अशा घडल्या आहेत. त्यातही बांगला देशाच्या निर्मितीचे सर्व श्रेय पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांचेकडे जाते. या नाजूक दिसणाऱ्या परंतु पोलादी मनाच्या बाईने या उपखंडात गेल्या पंधरा दिवसांत महान पराक्रम करून दाखविला आहे. या पराक्रमाने एका देशाला जन्म दिला आणि दुसऱ्या एका देशाचे कंबरडे मोडून टाकले.

अर्थात हा विजय त्यांनी मिळविला खरा, परंतु त्या विजयामुळे ज्या आणखी अवघड गोष्टींची जबाबदारी या देशावर पडलेली आहे त्यांना सामोरे जाऊन यशस्वी होणे ही आता खरी परीक्षेची गोष्ट आहे.

पाकिस्तानी रक्तपिपासूंनी बांगला देशातून रक्ताच्या नद्या वाहविल्या. निरपराध, बुद्धिजीवी आणि सुसंस्कृत नागरिकांची लाखोंच्या संख्येत हत्या केली. अनंत खेड्यांना आगी लावल्या आणि त्या देशाची अक्षरशः राखरांगोळी केली !

अशा भीषण आणि भयाण अवस्थेत स्वतंत्र झालेल्या बांगला देशाचे उत्तरदायित्व भारतावर पडलेले आहे. साडेसात कोटी लोकसंख्येचा हा देश आता पुन्हा नव्याने उभा करणे ही महान जबाबदारी आहे. अगोदरचे नऊ महिने या देशाचा भार भारताने वाहिलेला आहे. कोट्यवधी निर्वासितांचे पोषण आणि या देशाला पाकच्या पाशवी विळख्यातून सोडविण्यासाठी भारतावर जो अफाट लष्करी भार पडला आहे तो निमूटपणे पेलून पुन्हा किमान ८।१० वर्षे या नवनिर्मित देशाच्या उभारणीत त्याला सक्रीय हातभार लावणे भाग झालेले आहे. यासाठी सामाजिक, राष्ट्रीय, जातीय, आर्थिक आणि राजकीय चक्रव्यूहांचा भेद करूनच यशप्राप्ती करावी लागणार आहे.

या प्रश्नाची ही झाली केवळ एक अपरिहार्य बाजू. या प्रश्नाला आणखी किती तरी बाजू आहेत आणि त्यांचे रस्ते अत्यंत खडतर आहेत. दुसरी आणि लगेच लक्षात घ्यावी लागणारी बाजू म्हणजे पराभूत पाकिस्तान. पाकिस्तानमध्ये आज जे राजकीय नेते दिसतात त्यांचा पिंड लोकशाहीचा मुळीच नाही. इतकेच नव्हे, तर ते पक्के भारतद्वेष्टे आहेत. रक्तपिपासू आणि पाशवी हृदयाचे आहेत. त्यांच्या पार्श्वभागावर बसलेल्या सणसणीत लाथा त्यांना स्वस्थ बसू देणार नाहीत. त्यातच आता जनाब झुल्फिकार अलि भुट्टो यांची पाकिस्तानचे सर्व सत्ताधीश म्हणून नेमणूक झालेली आहे. सत्ता हाती घेतल्यानंतर या गृहस्थाने पहिले रेडिओवर जे भाषण केले ते राणाभीमदेवी थाटाचे होते आणि भारतद्वेषाने पूर्ण बरबटलेले होते. ' विजयाने हुरळून जाऊ नका. या पराभवाचा बदला आम्ही पुरेपूर घेऊ ! ' असे त्यांनी भारताचे संरक्षणमंत्री जगजीवन बाबू यांना बजावले आहे. म्हणजे जीभ कापली तरी वळवळत राहावी असा हा प्रकार असला, तरी जगातील भारतद्वेष्टी राष्ट्रे भुट्टोंच्या जिभेला मलमपट्टी केल्याशिवाय राहणार नाहीत! त्यात चीनचा पहिला क्रमांक लागेल. अमेरिकाही या चढाओढीत मागे राहणार नाही. (अर्थात् निक्सनसारखा मूर्ख राष्ट्राध्यक्ष मावळेपर्यंतच.)

म्हणून यापुढे प्रामुख्याने होऊ घातलेल्या मुत्सद्देगिरीच्या लढाईला भारताला चांगलेच तोंड द्यावे लागणार आहे. त्यामध्ये आपणाकडून बुळेपणाने काही चुकीच्या गोष्टी घडण्याचाही धोका आहे ! युद्ध संपल्यापासून आपल्या संरक्षण मंत्र्यांनी ' पाकबरोबर आम्हाला मैत्रीचे संबंध ठेवावयाचे आहेत. ' या वाक्याचा जो घोशा लावलेला आहे तो घातक आहे. गेल्या चोवीस वर्षांत बोलल्या गेलेल्या अशा वाक्यांचा ढीग उभा केला तर भारताच्या बाजूने दुसरा हिमालय उभा राहील ! ज्याला भारताच्या मैत्रीची मुळीच पर्वा नाही त्याच्यापुढे अशा भावनांचा जप करण्यात काय अर्थ आहे आणि त्यात कोणता शहाणपणा आहे ?

वास्तविक मर्यादित उद्देश साध्य झाल्याबरोबर भारताने एकतर्फी युद्धबंदी करून प्रत्यक्ष कृतीनेच आमचे पाकिस्तानशी वैर नाही हे जगाला दाखवून दिले आहे.

चोवीस वर्षे आपण हेच करीत आलो आहोत. आता जरा आपण गप्प बसून त्यांना आपल्याशी मैत्री करण्याची गरज वाटावी याची वाट पाहात बसायला हरकत नसावी !

पाकिस्तानला दहा हजार मैल दूर असलेल्या अमेरिकेशी मैत्री करावीशी वाटते. तसेच हिमालयाच्या पलीकडे असलेल्या चीनशी मैत्री करावीशी वाटते. वास्तविक या दोन्ही देशांशी पाकिस्तानचे राजकीय, सामाजिक वा सांस्कृतिक कसलेही जिव्हाळयाचे संबंध नाहीत. असतील तर उलट ते भारताशीच आहेत. असे असता केवळ काही दुष्ट हेतू मनात बाळगून पाक वरील दोन्ही राष्ट्रांच्या पायाशी गोंडा घोळत आहे, त्याच्या मदांध दृष्टीला भारताच्या मैत्रीची जोवर किंमत वाटत नाही तोवर जगजीवन बाबूंच्या वरील घोषवाक्याचा काय उपयोग होणार आहे ? परंतु आमच्या रक्तात भिनलेला नेभळेपणा विजयाच्या क्षणीही स्वतःचा विसर पडू देत नाही हेच खरे !

आता याह्याखान जाऊन भुट्टो पाकचे सर्व सत्ताधीश झालेले आहेत. म्हणजे लष्करी अंमल संपून तेथे नागरी प्रशासन सुरू झाले आहे. अशी समजूत करून घेणे चुकीचे आहे. अयूब आणि याह्यांपेक्षाही भुट्टो मनोवृत्तीने अत्यंत कडवा आहे. उलट अयूबला धोक्यात आणणारा जसा भुट्टो तसाच याह्या आणि पाकिस्तानचा सर्वनाश घडवून आणणाराही भुट्टोच आहे, यात तिळमात्रही शंका बाळगण्याचे कारण नाही ! हे गृहस्थ लोकशाहीच्या जरी गप्पा मारीत असले तरी खरे लोकसंहारक भुट्टोच आहेत. बांगला देशामध्ये जो रक्तपात आणि वंशहत्या घडली त्यात फार मोठा वाटा भुट्टोंचाच आहे. त्यांना पाकिस्तानचे पंतप्रधानपद हवे होते, याह्याला अध्यक्षपद सोडावयाचे नव्हते. त्यामुळे बांगला देशमध्ये या दोघांनी मिळून नरसंहार घडवून आणला. निवडणुकीचा कौल मानला तर मुजीब यांचेकडे पंतप्रधानपद जाते. पाकिस्तानच्या ज्या भागाचे गेली चोवीस वर्षे हे पठाण शोषण करीत आले होते त्या भागाची व्यक्ती पंतप्रधानपदावर बसविणे त्यांना कसे शक्य होते ?

थोडक्यात म्हणजे १९६५ सालचे युद्ध घडवून आणण्यास जसे भुट्टो कारणीभूत झाले, तसेच १९७१ सालच्या युद्धालादेखील तेच गृहस्थ जबाबदार आहेत. भारताविषयीचा द्वेष ज्याच्या रोमरोमी भिनलेला आहे, असा हा गृहस्थ आज पाकिस्तानचा सर्वसत्ताधीश झालेला आहे. अधिकार सूत्रे घेतल्यानंतर पहिल्याच भाषणात त्याने भारतावर द्वेषाचे आणि सूडाचे गरळ ओकले आहे. म्हणजे भुट्टोंची अवस्था अयूब व याह्यासारखी होईपर्यंत आपणास फार दक्ष राहावे लागणार आहे. पुन्हा बंधुप्रमाचे, शेजारधर्माचे वेडेवाकडे झटके आपल्याला येता कामा नयेत !

भूतदयेची तर भारताकडून लगेच सुरुवात झालेलीच आहे ! बांगला देशामध्ये शत्रूचे जे सैनिक आपल्या सैन्याला शरण आले त्यांना आम्ही मानाने वागवू आणि जिन्हेवा कराराप्रमाणे त्यांना सवलती दिल्या जातील अशा घोषणा लगेच आपल्या

तर्फे झालेल्या आहेस ! वास्तविक पाकच्या या लोकांना सैनिक म्हणणे म्हणजे सुद्धा सैनिकधर्माचा अपमान करण्यासारखे आहे. या लोकांनी सैनिक म्हणून काही कारवाई करण्यापेक्षा खाटिक म्हणूनच त्यांनी बांगला देशामध्ये कारवाई केलेली आहे. हे आता सर्व जगालाही माहीत झालेले आहे. भारतीय सैन्याला शरण येण्यापूर्वी काही तासच या लोकांनी पुन्हा एकदा निरपराध लोकांना गोळ्या घालून आपल्या जातीचे दर्शन घडविले होते. ज्यांच्या तोंडाला असत्याची दुर्गन्धी येत आहे आणि ज्यांचे हात निरपराध लोकांच्या रक्ताने बरबटलेले आहेत अशांना जिन्हेवा कराराचा मान देणं म्हणजे धर्मभोळेपणाचा कळस होय ! वास्तविक हे लोक युद्धकैदी नसून युद्धगुन्हेगार आहेत आणि त्याच दृष्टीने त्यांचा निवाडा केला पाहिजे.

याच संदर्भात पुन्हा दुसरी शंका अशी येते, की या गुन्हेगारांना आपण भारतात आणीत आहोत, म्हणजे हैद्राबादेहून पूर्वी जसा नजरकैदेत असलेला लायकअली पाकिस्तानात पळाला तसे त्यांनी पळून जाण्यासाठी ही वाट तर मोकळी केली जात नाही ना ?

जसे युद्धगुन्हेगारांच्या बाबतीत भारताचे धोरण न्यायनिष्ठुर आणि निर्भीड असले पाहिजे. तसेच युद्धबंदीनंतरच्या ज्या उत्तरक्रिया आहेत त्यांच्याबाबतीतही आपले धोरण जशास तसे आणि वास्तववादी असले पाहिजे. हे युद्ध पाकने आपल्यावर लादले आहे तेव्हा समेट करताना त्याला बरोबरीच्या नात्याने मुळीच वागविले जाता उपयोगी नाही. काश्मीरचा लचका पाकने तोडल्यानंतर इतकी वर्षे आपण 'काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे व पाकच्या ताब्यातील काश्मीरचा भागही आमचाच आहे.' असे म्हणत आलो आहोत. जगाला भारताची ही न्याय्य बाजू आजवर पटलेली नाही. आता आपल्या ताब्यात आलेल्या पाकिस्तानी प्रदेशाबाबत जेव्हा वाटाघाटी सुरू होतील तेव्हा स्वार्थाने बरबटलेलं जग मध्यस्थी पडण्याचा दाट संभव आहे. आणि जग न्याय्य भूमिकेवरून मध्यस्थी करणार नसून पाकच्या बाजूनेच मध्यस्थी करील हेही ठरल्यासारखेच आहे. तेव्हा तेथेही अत्यंत खंबीर आणि सावध राहणे भाग आहे. बळकावलेला काश्मीरचा प्रदेश परत केल्याशिवाय इतर प्रदेश पाकला मिळणार नाही अशी पूर्ण ताकीद पाकला आणि जगालाही आपण देऊन ठेवली पाहिजे.

तिसरी गोष्ट परकीय मदतीच्या बाबतीत आहे. परवाच्याच एका भाषणात पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी म्हणाल्या, 'बाहेरील मदत हे मदत घेणाऱ्या राष्ट्राला मोक्याच्या वेळी पेचात पकडण्यासाठी परकीय सरकारांच्या हातचे महत्त्वाचे हत्यार आहे.' या लढ्यात आपला काहीही अपराध नसता, एक कोटी निर्वासितांचा असह्य बोजा नऊ महिने आपण सहन केला असताना व उघड उघड आक्रमण पाकिस्ताननेच केलेले असताना अमेरिकेने आपल्यालाच दोषी ठरविले व आक्रमक म्हटले ! तेव्हा अमेरिकेतील या निक्सन राजवटीला काय म्हणावे ? ज्या

अमेरिकेचे अध्यक्ष अब्राहम लिंकन होते, ज्या अमेरिकेचा अध्यक्ष 'खरे बोलणारा' जॉर्ज वॉशिंग्टन होता; त्याच अमेरिकेचे 'खोटे बोलणारे' अध्यक्ष निक्सन आहेत हे केवढे दुर्दैव ! आपले आणि अमेरिकेचेही !

याचा अर्थ असाच घ्यावयाचा, की आजच्या जगातील राजकारण हे सत्तासमतोलाचे आणि सत्तास्पर्धेचे झालेले आहे. त्याला न्याय-अन्यायाची चाड आणि चीड मुळीच राहिलेली नाही. तेव्हा अशा जगाशी संबंध ठेवताना आपण किती जागरूक असायला पाहिजे याची कल्पनाच केलेली बरी. तसेच यापुढे मदत देताना आणि मदत घेताना हजार वेळा विचार करायला हवा. भारताला स्वातंत्र्य मिळून आज चोवीस वर्षे पूर्ण झाली. अशा परिस्थितीत भारतासारख्या पंचावन्न कोटी लोकसंख्येच्या राष्ट्राने अजूनही परकीय मदतीकडे आशाळभूत दृष्टीने पाहावे ही खेदाची व आपल्या स्वाभिमानाला तडा देणारी गोष्ट आहे. परकीय मदत न घेतल्यामुळे आमच्या प्रगतीचा वेग किंचित मंदावला तरी चालेल. पण त्यामुळे राष्ट्राचा स्वाभिमान जागा होईल आणि आत्मविश्वास वाढेल. तेव्हा आता अमेरिकेने मदत बंद केली आहे, त्याचा फायदा घेऊन आपल्या राज्यकर्त्यांनी बिनमदतीच्या पंचवार्षिक योजना आखल्या पाहिजेत.

दुसरी गोष्ट आपल्या परराष्ट्रीय धोरणाची. आपले परराष्ट्रीय धोरण अतिशय बुळे आहे. यात काही शंका उरलेली नाही. यूनोच्या आमसभेतील मतदानात १०४ राष्ट्रे भारताच्या विरुद्ध मत देतात याचा खोल अर्थ ध्यानी घेतला पाहिजे. अर्थात याचा अर्थ ती राष्ट्रे पाकच्या बाजूची आहेत असाही मी लावीत नाही. माझ्या



दृष्टीने पाकिस्तानला राष्ट्र म्हणून जगात अस्तित्वच राहिलेले नाही. पाकच्या राज्यकर्त्यांचा जर असा समज असेल, की परराष्ट्रीय राजकारणात भारतापेक्षा आपल्याला जास्त प्रतिष्ठा आहे तर तो त्यांचा भ्रम आहे! आमसभेतील हा चमत्कार पाकचा नाही तर अमेरिका आणि चीनचा आहे. अमेरिका आणि चीन यांच्या आशियातील राजकीय डावपेचांचे पाक हे एक खेळणे आहे! या दोन्ही राष्ट्रांची पाकशी त्याच्या जन्मापासून मैत्री आहे! ही मैत्री जर खरोखरच अंतःकरणापासून असती तर एव्हाना या दोन्ही राष्ट्रांनी मिळून पाकला अंतर्बाह्य शक्तिमान करून सोडले असते. तसे ते ज्याअर्थी झाले नाही त्याअर्थी ती मैत्री नसून तो स्वार्थ आहे असे समजण्यास हरकत नाही. परवाच्या भारताच्या रामटोल्याने तर पाकबरोबरच ही दोन्ही महान राष्ट्रेदेखील जगाच्या बाजारात उघडी पडली आहेत!

अर्थात हे सारे घडले ते प्रथमपासूनच पाक नेत्यांनी लोकशाहीची पर्वा केली नाही म्हणून. धर्माला राष्ट्रउभारणीच्या संदर्भात अवास्तव महत्त्व दिले म्हणून. लष्करी शक्ती जनशक्तीपेक्षा नेहमीच श्रेष्ठ मानली म्हणून. आणि राज्यकारभार नेहमीच पाचदहा लोकांच्या हातात आणि मर्जीवर ठेवला म्हणून.

जनजागृती झाली म्हणजे काय होते याचा अनुभव भारताला तर फार जुना आहे, पण पाकला परवा बांगला देशाच्या उत्थापनाने चांगलाच आला. आता तरी जनाब भुट्टो इतर वेड्या वल्गना करण्याऐवजी जनतेची शक्तिकिमया ओळखतील आणि राहिलेल्या पाकला भारताच्या सहकार्याने शक्तिवान करतील अशी आशा आहे. अमेरिका आणि चीन यांसारख्या डोमकावळ्यांपासून ते जितके दूर राहातील त्यातच त्यांचे आणि त्यांच्या देशाचेही हित आहे. पाक जनतेचे भारतीय जनतेशी शेकडो वर्षांचे जुने आणि रक्ताचे संबंध आहेत. तसेच भौगोलिक संबंधही तितकेच निकटचे आहेत. हे जर जनाब भुट्टो यांनी ओळखले नाही, तर पश्चिम पाकची आणखी तीन राष्ट्र होण्यास फारसा वेळ लागणार नाही. लोकशाही, समाजवाद आणि धर्मातीततेच्या तत्त्वांवर राष्ट्रउभारणीत गुंतलेल्या भारताचा प्रभाव बांगला देशाप्रमाणेच पश्चिम पाकच्या या तिन्ही भागांवर पडल्याशिवाय खचित राहणार नाही. निक्सन-माओ पेक्षा पाकच्या जनतेला आज महात्मा गांधी आणि इंदिरा गांधींचीच नीती अधिक जवळची आहे. हे धोरण ओळखूनच आज भारताची पावले पुढे पडली पाहिजेत.

□ □ □

मुक्काम शहादे :

# निझर गावचा एक आदिवासी

**देवराम अंभुरे**

सीमेवर भारत-पाकचे युद्ध सुरू केव्हा झाले आणि संपले केव्हा याचा पत्तासुद्धा गरीब समाजाला लागला नसावा. सीमेवर आपले जवान प्राणाची बाजी लावून बांगला देश सर करीत होते. डाक्क्यावर मोठ्या डौलाने आपल्या जवानांनी बांगला देशाचा झेंडा फडकाविला. आणि एकच आवाज सर्वत्र घुमला. जय बांगला जय हिंद, जय मुजीब, जय इंदिरा गांधी !

युद्ध विराम झाला ! तिकडे बांगला देशात आनंदोत्सव तर इकडे शहादे भागात काय ?

भारत स्वतंत्र होऊन चोवीस वर्षे झाली, पण सातपुडा पर्वताच्या कुशीत बसणारा गरीब आदिवासी समाज अद्यापही विकासापासून वंचितच राहिला.

एका आदिवासीला विचारले, ' देशात फार विकास झाला असे पुढारी सभांतून सांगत असतात. त्याचा काही फायदा तुम्हास नाही का मिळाला ?' त्याचा चेहरा प्रश्नार्थक झाला. ' विकास ? साहेब, विकास हे सावकाराच्या मुलाचे नाव आहे. तो मुलगा शहरात राहातो. तो कशाला भेटेल आम्हासनी ?'

या आदीवासीच्या बोलण्यावरून स्पष्ट दिसते की शहरात राहणारे व्यापारी मोठमोठे शेतकरी, पुढारी यांनीच विकासाची गंगा आपल्या दारात अडविली आहे. जर ही विकासाची गंगा खेड्यात, आदिवासींच्या झोपडीपर्यंत गेली असती तर चोवीस वर्षानंतर इंदिरा गांधींना गरिबी हटावची घोषणा देण्याची गरज नव्हती. इंदिरा गांधींना गरिबाची गरिबी दिसली. परंतु त्यांचे चेले गरीब आदिवासींची जमीन घेऊन, त्यांना रोजंदारी कमी देऊन, बेकार ठेवून, महागाईची आग लावून विकासाच्या नावावर दिमाखाने मिरवत आहेत. निरपराध आदिवासींवर खोटे-नाटे आरोपपत्र ठेवून पोलिसांचा ससेमिरा मोठमोठ्या जमीनदारांनी गावोगाव लावला आहे. चोरीच्या, मारामारीच्या आरोपाखाली समन्स घेऊन पोलीस अचानक उभा राहातो. गावात काम नाही. म्हणून उपासमार. व्यवहाराचे ज्ञान नाही म्हणून कोर्टकचेऱ्यांचे हेलपाटे !

या भागात एक नाही अनेक प्रकारचे अन्याय आदिवासीबंधूवर चालू आहेत. होणाऱ्या अन्यायांच्या तक्रारींचा भला मोठा गठ्ठाच आता येथे काम करणाऱ्या सर्वोदयी कार्यकर्त्यांजवळ जमला आहे. नमुन्यासाठी एक-दोन प्रसंग वाचकांपुढे ठेवतो.

● एक आदिवासी मजूर निझर गावाहून नवगाव या आपल्या सासऱ्याच्या गावी येत होता. दमलेला होता. सावकाराने त्याला जाण्याची परवानगी दिली नव्हती. आदिवासी मनात म्हणला असावा, तुम्ही परवानगी द्या अगर देऊ नका. मी जाणार! सावकाराने झालेल्या कामाची एक दमडीसुद्धा या मजूर माणसाला दिलेली नव्हती.

पंचवीस मैलांची चाल तो भुकेल्या पोटी करीत होता. चिचाळे गावी संध्याकाळ झाली. ६ वाजले असतील. त्याचे नवगाव फक्त दोन मैल राहिले होते. त्याला वाटले, जास्त रात्र होऊ नये म्हणून पळावे. तो चिचाळे गावापासून पळू लागला.

चार धिप्पाड माणसे हातात दंडे घेऊन त्याच्यावर धावून आली. मागे-पुढे न पाहाता त्याच्या पाठीवर त्यांनी दड्याचे नऊ दहा दणके मारले तो मोठ्याने ओराडला. मी चोर नाही, मी एक गरीब माणूस आहे, मला मारू नका असे सांगत होता. पण 'बदमाश! चोरी करतोस? आणि पळून जातोस? बरा सापडला.' म्हणून त्या रखवालदारांनी त्याचे हातपाय धरले. मारत मारत त्यास सावकाराची मिरच्याची बाग होती. त्या बागेच्या काठावर नेले. त्या निरपराध माणसाची टोपी काढली. त्या टोपीत मिरच्या भरल्या. आणि फरफटत त्याला गावात नेले. 'मी चोर नाही. चोर नाही' असे तो गरीब आदिवासी सारखे म्हणत होता व ते चार दांडगे रखवालदार 'बदमाश लेकाचा' म्हणून त्यास खांबाला बांधून ठेवीत होते. त्यांनी त्याच्या तोंडात दोन-चार थपडाही लगावल्या. सारा प्रकार चिचाळे गावकरी उघडया डोळयांनी पाहून निघून गेले.

रात्रभर थंडी. अंगावर धड कपडा नाही. पहारेकऱ्यांच्या मारामुळे पाठ ठणकत होती. हालचाल करावी तर हात बांधलेले. पोटात दिवसभर अन्नाचा कण नाही. तहान लागली तर पिण्यास फुकटचे पाणीही नाही. अशा त्या माणसाने रात्र काढली.

दिवस उजाडला. दहा अकराच्या सुमारास नवगावातील घरच्या माणसास बातमी गेली. ते चिचाळे गावी आले. नातेवाईक त्या रखवालदारांच्या पाया पडले. 'हा चोर नाही, हा आमचा माणूस आहे, सोडून द्या त्याला, गेले कित्येक महिने आम्हास भेटला नव्हता.' अशी त्यांनी रखवालदारांना विनंती केली. शेवटी त्या माणसाची सुटका झाली.

वाकत वाकतच तो नवगावला आला. नवगावला सर्वोदय कार्यकर्त्यांनी जाहीर सभा घेतली होती. पण सभा संपली होती, तरी मंडळी इकडे तिकडे थांबलेली होती. शेवटी गोविंदराव शिंदे, अमरसिंग पाडवी वगैरे लोकांनी आदिवासीला मोटारीत घेऊन तळोदे येथे नेले. पोलीस स्टेशनवर तक्रार नोंदविली. तक्रार नोंदून

घेतल्यावर पोलीस अधिकारी म्हणाले– गरिबांना या भागात अशीच नाहक मारपीट होते. आमच्याकडे अनेक तक्रारी येत असतात.

शहादे व तळोद्याच्या पोलीस कचेरीत पुष्कळदा आपल्या केसेस घेऊन आता गरीब लोक येंऊ लागले आहेत. तेवढे ते आता धीट झाले आहेत. पूर्वी हेही त्यांना जमत नव्हते. पोलीस अधिकाऱ्यांवर सर्व प्रकारचा दबाव येतो. त्यातून कंगाल गरिबांना न्याय मिळतोच असे नाही.

● चांद सौली गावची घटना. बिचारी म्हातारी झिपाबाई एक दिवस शहाद्याच्या बाजाराकरिता पायी येत होती. खेतीया रोडवर दहा फाट्याच्या अलीकडे एका पुढाऱ्याच्या जीपची ठोकर त्या बाईला बसली. दोन्ही पाय लुळे पडले. तसे ते पुढारी उतरले आणि जीपमधून निघून गेले. ड्रायव्हरने त्या जखमी बाईला लगेच जीपमध्ये टाकले आणि शहाद्याच्या दवाखान्यात पोचते केले. या शहादे दवाखान्यात त्या जखमी बाईस घेतले नाही. पुढे लगेच धुळ्याच्या दवाखान्यात नेले. दोन्ही पाय प्लॅस्टर करून त्या बाईला परत आपल्या घरी पाठवून दिले आहे. कोणी या बाईला जखमी केले? पोलीस केस का झाली नाही? या बाईस पूर्ण बरे करण्याची जबाबदारी जखमी करणाऱ्या पुढाऱ्यांवर आहे की नाही? याची चर्चा आज सर्वत्र चालू आहे.

सर्वोदय कार्यकर्ते आता गावोगाव जाऊन अन्यायविरोधी लोकशक्ती उभी करीत आहेत. सभा घेत आहेत. लोकांना भेटत आहेत. त्यांच्या अडचणी शासनासमोर मांडीत आहेत. गरीब समाजात जागृतीची लाट निर्माण करीत आहेत. तळोद्याला एखादी सभा घ्यावी अशी मागणी श्री. अमरसिंग पाडवी व त्यांचे सहकारी यांनी केली. त्याप्रमाणे नुकतीच तळोद्याला सभा झाली. स्मारक चौक तुडुंब भरून गेला होता. १५–२० मैलांवरून बायका, तरुण, वृद्ध पायी चालत आले होते. सभेत आपल्याला पुढे बसावयास मिळावे म्हणून प्रयत्न चालला होता.

बरोबर एक वाजता अबरसिंग, महाराज गोविंदराव शिंदे व इतर आदिवासी कार्यकर्ते सभास्थानी आल्यावर एकदम शांतता पसरली. प्रथम पाडळदे गावच्या एका भिल्ल तरुणाने ग्रामस्वराज्याचे गीत म्हटले. सभेला सुरुवात झाली. नंतर गोविंदराव शिंदे, अंबरसिंग महाराज, देवराम अंभुरे, भगतसिंग धमाणे यांची भाषणे झाली. शेवटी रंजना पवार यांनी आभार मानले. सभा तीन तास चालली. लोक बसूनच होते. त्यांना आणखी ऐकावयास मिळावे असे वाटत होते. सभेमध्ये सर्व वक्त्यांनी या भागातल्या परिस्थितीची, अडचणींची सविस्तर चर्चा केली. मार्ग सांगितला. १९०२ साली त्या वेळच्या इंग्रज सरकारने जमिनी आदिवासींकडे राहाव्यात म्हणून त्या नव्या शर्तीच्या करून त्यांना दिल्या. नव्या शर्तीच्या म्हणजे त्या कोणाला विकता येणार नाहीत. स्वराज्य आले व या नव्या शर्तीच्या जमिनी साऱ्याच्या

पृष्ठ ४८ वर

## श्रेष्ठ प्रादेशिक शक्ती

चीनविषयी असे अनेकदा म्हटले जाते, की जेव्हा जेव्हा चीनमधील मध्यवर्ती सत्ता प्रबळ बनली तेव्हा तेव्हा ते राष्ट्र विस्तारवादी बनले. परंतु हे केवळ चीनचेच वैशिष्टच आहे असे नाही. तर इतर अनेक राष्ट्रांच्या संदर्भात, किंबहुना भारताच्या संदर्भातसुद्धा हे विधान करता येईल. अगदी अर्वाचीन काळातही जेव्हा ब्रिटिश सत्ता भारतात बद्धमूल झाली तेव्हा त्या सत्तेच्या छत्राखाली आग्नेय आशिया, पूर्व आफ्रिका, सिलोन, कॅरिबिअन बेटे या प्रदेशांत भारतीय जनता विस्तारली. एका परकीय सत्तेच्या आश्रयाने जर भारतीय जनता इतकी विस्तारवादी बनते, तर स्वकीय सत्ता प्रबळ झाल्यावर भारतीय विस्तारवादी वृत्ती जाणवू लागल्यास नवल नाही.

चीनचा विस्तारवाद आणि भारतीय विस्तारवाद यात एक फरक आहे. चिनी राजकीय विचारांतील प्रबळ शक्तीची कल्पना सूर्यानुलक्षी आहे. आकाशात एकाच वेळी दोन सूर्य दीप्तिमान राहू शकत नाहीत, त्याचप्रमाणे एकाच वेळी दोन शक्ती सर्वश्रेष्ठ असू शकत नाहीत. चीनमध्ये एखादी सत्ता प्रबळ झाल्यावर इतर सत्तांचा पूर्ण नाश त्या सत्तेने करावा हे या विचारानुसार क्रमप्राप्तच होते. या उलट प्रबळ शक्तीची भारतीय कल्पना सामंत चक्रान्वित सम्राटाची आहे. भारतीय सत्ता प्रबळ झाल्यास ती इतर राजवटींना मांडलिकत्व स्वीकारण्यास भाग पाडते. त्या राजवटींचा बीमोड करीत नाही. चिनी विस्तारवाद जाणवला व भारतीय विस्तारवाद अनेकदा अनुल्लेखिला गेला याचे हे एक कारण आहे.

हल्लीच्या काळात विस्तारवाद ही कल्पना तिरस्करणीय बनली आहे. पण कल्पना तिरस्करणीय झाली तरी नाहीशी होतेच असे नाही. जरा निराळ्या व नव्या काळाला शोभून दिसेल अशा रूपात ती कल्पना पुन्हा अवतरते. इतिहासकालीन विस्तारवाद हल्ली शक्तिवाद या नावाने वावरतो. विस्तारवादाचे अनेक दोष या शक्तिवादाने टाकून दिले आहेत हे खरे, पण आपल्या भौगोलिक सीमांपलीकडील प्रदेशांवर प्रभाव पाडण्याची राष्ट्रांची वृत्ती ही गोष्ट या दोन्ही वादात अभिप्रेत आहे.

भारताचा विस्तार, लोकसंख्या व नैसर्गिक संपत्ती लक्षात घेता, स्वातंत्र्योत्तर काळात मध्यवर्ती सत्ता प्रबळ राहील अशी घटना अस्तित्वात आल्यावर, दक्षिण आशियाई प्रदेशात सर्वश्रेष्ठ शक्ती म्हणून भारताचे अस्तित्व जाणवावे हे स्वाभाविक होते. तशी आकांक्षा भारतीय नेत्यांनी बाळगली तर तेही स्वाभाविकच म्हटले पाहिजे. किंबहुना ते इष्ट होते असे मानावयासही कारण आहे. कोणत्याही भौगोलिक प्रदेशात शांतता राखण्याचे तीन उपाय आहेत. सहजीवन, सत्तासमतोल व एकराष्ट्राधिपत्य. त्यापैकी सहजीवन हा उपाय आंतरराष्ट्रीय संबंधांच्या सध्याच्या

अवस्थेत अवास्तव ठरेल. दक्षिण आशियाई प्रदेशांत सत्तासमतोल राहणे कठीण आहे. कारण भारताशी तुलना होईल असा दुसरा देश नाही. पाकिस्तानला लष्करी मदत पुरवून असा सत्तासमतोल कृत्रिम रीतीने निर्माण करण्याच्या प्रयत्नांचे परिणाम अशांतता निर्माण होण्यात झाले, हे स्पष्ट झालेच आहे. तेव्हा दक्षिण आशियात शांतता राहावयाची असल्यास या प्रदेशातील सर्व श्रेष्ठ शक्ती म्हणून भारताने जबाबदारी उचलली पाहिजे हे उघड आहे.

या सर्व गोष्टी मनात येण्याचे कारण असे की, पाकिस्तानचा निर्णायक पराभव झाल्यापासून अनेक राजकीय निरीक्षक असे मानू लागले आहेत, की दक्षिण आशियाई प्रदेशांत भारत ही सर्वश्रेष्ठ शक्ती आहे. येथे सर्वश्रेष्ठ प्रादेशिक शक्तीची लक्षणे कोणती, तिच्या जबाबदाऱ्या कोणत्या याचा विचार या प्रदेशांतील आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या संदर्भात करावयाचा आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाची अनेक अंगे आहेत. येथे केलेले विवेचन फक्त शक्ती-समीकरणांच्या संदर्भातच आहे.

पाकिस्तान या राष्ट्राचा जीव मुळातच लहान. लोकसंख्या, विस्तार, निसर्ग-संपत्ती या शक्ती-अंगांपैकी कोणत्याच अंगाने भारताशी पाकिस्तानची तूलना होण्यासारखी नव्हती. असे असताही श्रेष्ठ जागतिक शक्तींनी पाकिस्तानला शस्त्रांची मदत करून भारताला शह बसावा अशी व्यवस्था केली. पाकिस्तानच्या विघटना-मुळे तो शह उरला नाही आणि भारताचे शस्त्र सामर्थ्य हिमालयाच्या दक्षिणेला निस्तुल झाले म्हणून या प्रदेशात भारत ही श्रेष्ठ शक्ती आहे, असे सांगितले जाते. परंतु केवळ श्रेष्ठ सैनिकी सामर्थ्य हा श्रेष्ठ-शक्तित्वाचा निकष होऊ शकत नाही. दक्षिण-आफ्रिका भागात दक्षिण आफ्रिका या देशाचे सामर्थ्य अकुतोभय असे आहे. तथापि, त्या प्रदेशातील सर्वश्रेष्ठ शक्ती म्हणून त्या राष्ट्राला क्वचितच मानले जाते.

पश्चिम आशियात इजिप्तचे श्रेष्ठत्व निर्विवाद आहे. इस्राएलकडून अनेकदा पराभव होऊनही पश्चिम आशियातील सर्वश्रेष्ठ शक्ती म्हणून त्या राष्ट्राला मान्यता आहे. कारण त्या राष्ट्राचे हिससंबंध प. आशियातील सर्व देशांत पसरले आहेत. सौदी अरेबिया, इराक, सीरिया इत्यादी कोणत्याही देशात काहीही उलथा-पालथ झाली तरी इजिप्तच्या हितसंबंधांना धोका पोचतो व ते हितसंबध राखण्या-साठी योग्य ती हालचाल तो देश करतो. म्हणजे सर्व प्रदेशभर हितसंबंध पसरलेले असणे आणि ते संबंध कायम ठेवण्यासाठी कृतिशील असणे हे श्रेष्ठ शक्तीचे दुसरे लक्षण आहे.

बांगला देशाबाबत आपण केलेल्या युद्धाचे हेच महत्त्व आहे. या युद्धामुळे हे स्पष्ट झाले, की भारतीय उपखंडातील देशात ज्या प्रकारच्या राजवटी असतात त्यावर भारताचे हितसंबंध अवलंबून असतात. त्यामुळे पाकिस्तानातील हुकूमशाही राजवट ही पाकिस्तानची अंतर्गत बाब राहात नाही. त्या राजवटीने बांगल्यात चालविलेले अत्याचार थांबतील अशी कृती करण्याचा आम्हाला हक्क आहे व तो हक्क कोणत्याही राष्ट्राच्या दडपणाला न जुमानता आम्ही बजावणार. हिमालयाच्या दक्षिणेकडील सर्व देशांत भारतीय हितसंबंध गुंतलेले आहेत व ते कायम राहावेत

म्हणून कृतिशील राहण्याचा भारताचा निर्धार आहे.

पण श्रेष्ठ प्रादेशिक शक्तीची कल्पना वरील दोन लक्षणांनी पूर्ण होत नाही. दक्षिण आशियाई भागांतील घडामोडींविषयी आपण या पूर्वीही कृतिशील होतो. नेपाळचे राजे त्रिभुवन यांच्याविरुद्ध झालेली बंडाळी मोडून नेपाळात लोकशाही राजवट आपण स्थापन केली होती. सिक्कीम व भूतान यांच्या बाबतची जबाबदारी आपण कायमच सांभाळत आलो आहोत. सिलोनमधील बंड मोडण्यासही आपण साहाय्य केले होते. आपण केवळ आपल्या परिसरांतील बाबींविषयीच कृतिशील होतो असे नाही, तर कॉंगो, कोरिया, इंडोचायना, सायप्रस इत्यादी दूरच्या घडामोडींबाबतही कृतिशील होतो. पण म्हणून आपल्याला कोणी जागतिक अथवा प्रादेशिक शक्ती मानले नव्हते.

याचे कारण असे, की आपण कृतिशील होतो, तरी जग आपणाकडून कृतीची अपेक्षा करीत नव्हते. निराळ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे आपल्या कृतिशून्यतेला कृतिशीलतेचे मूल्य प्राप्त झाले नव्हते. आपली कृतिविहीनता परिणामकारक नव्हती म्हणून कृतिप्रवणताही क्षीण-परिणामी होती. श्रेष्ठ शक्ती तीच की जिची कृतिशून्यता कृतिशीलतेइतकीच दीर्घकालीन महत्त्वाची असते. अमेरिका ही एक श्रेष्ठ जागतिक शक्ती आहे, कारण झेकोस्लोव्हाकियाबाबत तिने दाखविलेला कृतीचा अभाव, क्यूबाबद्दल तिने केलेल्या कृतीइतकाच महत्त्वाचा ठरला. सारांश कृतिशून्यता महत्त्वपूर्ण असणे हे श्रेष्ठ शक्तीचे तिसरे लक्षण आहे.

येथेच श्रेष्ठ शक्तींवरील – मग त्या प्रादेशिक असोत की जागतिक – जबाबदारी स्पष्ट होते. श्रेष्ठ शक्तीसमोर असणारे पर्याय थोडे असतात. लहान राष्ट्रे एखाद्या घटनेबाबत तटस्थ व कृतिविहीन राहू शकतात कारण त्यांच्या तटस्थतेला महत्वाचा अर्थ नसतो. पण शक्तिशाली राष्ट्रांच्या कृतिशून्यतेलाही अर्थ असल्याने त्यांना कृतिप्रवणता की कृतिविहीनता यात विवेक करावा लागतो. हा विवेक फार कठीण आहे. दुसऱ्या महायुद्धापूर्वी जर्मनी शस्त्रसंपन्न होत असता इंग्लंड या जागतिक शक्तीने त्याकडे दुर्लक्ष केले. परिणामी दुसऱ्या महायुद्धाचे संकट ओढवले. याउलट व्हिएटनामप्रश्नाबाबत योग्य विवेक न करता अमेरिकेने कृतिशीलतेचा स्वीकार केला. त्याचे परिणाम जग सध्या अनुभवत आहेच.

बांगला देशासंबंधींच्या युद्धानंतर जर आपणाला श्रेष्ठ प्रादेशिक शक्ती म्हणून मानले जाणार असेल तर त्याचा अर्थ हा असा आहे. यापुढे कमीत कमीत दक्षिण आशिया भागातील घडामोडींसंबधी तरी आपणास उदासीन राहाता येणार नाही. मलेशिया-इंडोनेशिया, सिंगापूर-मलेशिया, ब्रह्मदेशातील राजकारण, पख्तुनिस्तानचा प्रश्न याबाबत आपण आजवर बव्हंशी संन्यस्त राहिलो कारण आपला कृतिसंन्यास अर्थपूर्ण नव्हता. यापुढे मात्र आपल्याला कृतिशून्यता व कृतिशीलता यातील सूक्ष्म विवेक पदोपदी करावा लागणार आहे. तो विवेक करण्याचे बुद्धिसामर्थ्य आपल्या नेत्यांना लाभावे अशीच कोणाचीही इच्छा असणार.

□ □ □

सौ. तारा पंडित

# हे कलकत्ता

## वीणाचे वागणे अन् विद्यापीठ केविलवाणे !

खूप दिवसांनी वीणाची भेट होत होती.

'काय, एकटीच आलीस ?'

'हो, परीक्षा राहिली ना. यावंच लागलं.'

वीणाचे लग्न घाईने उरकण्यात आले होते. कारण जावईबुवांना सुटी नव्हती. अमेरिकेला लागलीच परत जायचे होते. परीक्षेसाठी म्हणून वीणा आता इथे आली आहे, आई-बाबांकडे. तिची अकस्मात गाठ पडली, त्यांच्याकडेच. गप्पांना ऊत आला.

'मग ?...झाली का सुरू परीक्षा ? जाधवपूर युनिव्हर्सिटी तुमची ! पेपर नीट होतात का ?' मी विचारले.

'एक पेपर झालासुद्धा. पण गंमतच झाली.' असे म्हणून तिने साद्यंत हकीकत सांगितली ती थोडक्यात अशी –

वीणा B.Farm.ची परीक्षा देते आहे. या कोर्सला मुली अगोदरच कमी. अन् वीणा त्यात एकटीच महाराष्ट्रीयन. पहिला पेपर होता त्या दिवशी मुलांनी मागणी केली, की त्यांना कॉपी करण्याची परवानगी देण्यात यावी. पण ती मिळाली नाही म्हणून मुलांनी पेपर फाडून टाकले आणि सर्वजण उठून हॉलच्या बाहेर गेले. इतर मुलींनीही त्यांना साथ दिली. पण वीणाला कोणीच अडथळा न केल्याने ती आपली एकटीच पेपर लिहीत बसली. तीन तासांत सर्व पेपर सोडवून झाल्यावर ती तो परीक्षकांजवळ देऊ लागली. पण ते काही घेईनात. म्हणाले– "बाकी कोणीच पेपर लिहिला नाही, तुझा एकटीचा पेपर कसा स्वीकारणार ?'

वीणा म्हणाली–'इतरांनी पेपर लिहिला नाही हा माझा दोष नाही. मी लिहिला आहे. तुम्ही तो घ्यायलाच पाहिजे.' पण ते गृहस्थ ऐकेनात. शेवटी ती डीनकडे गेली. ते म्हणाले–

'हे बघ, तुझा पेपर मी स्वीकारतो. पण तो तपासून मार्क दिले तर तुझा एकटीचाच निकाल जाहीर करावा लागेल. इतरांनी पेपर लिहिलाच नाही त्याअर्थी ते सर्व नापास झाले आहेत असेच जाहीर करावे लागेल. आणि जाधवपूर युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत हे जाहीर करणं किती धोक्याचं आहे हे तू जाणतेसच.'

डीनची केविलवाणी मुद्रा बघून वीणा गालात हसली. मग म्हणाली–'न्यूयॉर्कला

हाच कोर्स आहे. तेथे परीक्षेला बसण्याची मला परवानगी द्यावी. वाटल्यास इन्व्हिजिलेशनचा सर्व खर्च माझा मी करीन. मला न्यूयॉर्कला जितक्या लवकर जाता येईल तितकं बरं. कारण माझे पती तेथे आहेत.'

वीणाचे म्हणणे डीनसाहेबांना पटले असले तरी तशी परवानगी ते देऊ शकत नव्हते. डिग्री हवीच असेल तर येथे राहूनच परीक्षा द्यायला पाहिजे असे त्यांनी तिला सांगितले. मग म्हणाले –

'ज्या पेपरला मुलांनी गडबड केली तो पेपर पुन्हा नव्याने घेणार आहोत. तुला पुन्हा तोच पेपर लिहिण्याची इच्छा नसल्यास तुझा हाच पेपर आम्ही Consider करू.'

वीणा लगेच म्हणाली – 'पुन्हा पेपर लिहिण्यास मी तयार आहे.'

'खरंच, तू फार चांगली मुलगी आहेस.' हा डीनसाहेबांचा शेरा बरोबर घेऊन वीणा अभिमानाने घरी परतली.

## कोणाचा उपसर्ग कोणाला !

'मिस्टर, उद्यापासून लवकर या बरं का ऑफिसमध्ये.' एक गृहस्थ दुसऱ्या एका गृहस्थांना म्हणाले. हे जरा आपल्या अनियमितपणाबद्दल प्रसिद्ध होते. याचा अर्थ पहिले गृहस्थ वक्तशीर होते असा मुळीच नव्हे. फक्त त्यांच्या वक्तशीरपणाचे प्रमाण कमीजास्त होते एवढेच !

दुसऱ्या गृहस्थांनी आश्चर्याने विचारले – 'लवकर कशासाठी ?'

'अहो, तुमची खुर्ची जाईल नाहीतर.'

'म्हणजे ?'

'अहो, तुम्ही मिदनापूरची ती बातमी वाचली नाहीत ? तोच प्रकार इथं व्हायचा. म्हणून म्हणतो.'

'असं होय. मग लवकर यायलाच हवं उद्यापासून.' दुसरे गृहस्थ हसत म्हणाले.

झालं काय, मिदनापूरमधील एका सरकारी ऑफिसात फारच अंदाधुंदी होती. टेबलांवर फाइल्स उघड्या, पण कर्मचाऱ्यांचा पत्ता नाही. कोणी उशीरा येत, कोणी आल्याआल्याच चहा प्यायला निघून जात. कोणी सिगरेटी फुकत बाहेर उभे, तर कोणी गप्पा करण्यात दंग. थोडक्यात, काम कोणीच करत नव्हते. एके दिवशी अचानक कुठूनतरी तरुणांचे एक टोळके आले आणि ऑफीसमध्ये शिरले. चपराशाजवळ सगळे बाबूलोक कुठे आहेत म्हणून त्यांनी चौकशी केली आणि सरळ रिकाम्या खुर्च्यांमध्ये आसने ठोकली. काही वेळाने नेहमीच्या सवयीप्रमाणे कर्मचारी डुलत डुलत येऊ लागले आणि आपापल्या खुर्चीत निराळाच माणूस पाहून चकित झाले. तुम्ही कोण, इथे का आलात अशी चौकशी करू लागले पण त्या तरुणांचा आविर्भाव

पाहूनच त्या सर्वांना इतकी धडकी भरली, की त्यांना एक अक्षर धड उच्चारता येईना. त्या तरुणांनी सर्व कर्मचाऱ्यांना खूप दम भरला. ‘ उद्यापासून वेळेवर आला नाहीत तर याद राखा, आमच्याशी गाठ आहे.’ असे बजावून ती तरुण मंडळी तेथून पसार झाली. हे सर्वजण कोण होते, कोठून आले हे कोणालाच कळले नाही. ते जाणून घेण्याऐवजी त्यांनी दिलेल्या धमकीचाच विचार अधिक तीव्रतेने सर्वांच्या मनात घोळू लागला.

मिदनापूरची ही घटना इकडच्या सरकारी ऑफिसांमध्येही काही अंशी परिणाम करती झाली.

## काय नेम सांगावा ?

अचानक त्याला बीरेश्वर दिसला – इकडे तिकडे पाहात नि स्वतःशीच बडबड करीत असलेला. मित्राला आश्चर्य वाटलं. याचं डोकं चांगलं ठिकाणावर आहे. मग हे बडबडत हिंडणं कशासाठी ? तो काय बडबडतोय हे दुरून लक्षात आलं नाही, म्हणून मित्र त्याच्या जवळ गेला. मग सारं स्पष्ट ऐकू आलं. –‘ मिस्टर चाटरजी ... १२।२३।४५ A ... बेनी माधव मुन्शी लेन...अरे, अर्धा तास झाला, सारखा भटकतोय...अजून पत्ता सापडेना !’

सुदैवाने मित्राला चाटरजींचं घर माहीत होतं. पटकन् तो म्हणाला, ‘चल, मी दाखवतो त्यांचे घर तुला.’ बीरेश्वर आपल्याच तंद्रीत होता. थोड्यावेळाने भानावर आला. म्हणाला –तू आहेस होय ? मला वाटलं कुणी गुंडाच आहे !’

क्षणभरासाठी का होईना, पण त्याने आपल्याबद्दल अशी कल्पना करावी हे मित्राला रुचलं नाही. पण तिकडे त्याने दुर्लक्ष केलं. म्हणाला –

‘ अरे, चाटरजींचं घर हवंय ना तुला ?’

‘ हो, हो. त्यांचा नंबर आहे...’

‘ मला माहीत आहे. तू चल माझ्याबरोबर. ३५१।१५–N या घराला लागूनच त्यांचं घर आहे.’

‘ अस्सं ? आश्चर्यच आहे !’ बीरेश्वर म्हणाला.

‘ आश्चर्य कसलं ?’

‘ काही नाही...पण काय रे तुझी चाटरजींशी ओळख आहे ?’

‘ हो, आहे की.’ मित्र म्हणाला.

‘ माणूस कसा काय आहे ?’

‘ तसा चांगला आहे. पण मला त्याची जास्त माहिती नाही.’

‘ फायर ब्रिगेडमध्येच नं ?

‘ होय.’ मित्र उत्तरला.

'मग, हाच तो माणूस आहे ज्याला मी शोधतोय् केव्हाचा.'

'पण कशासाठी रे ?"

'सांगायला हवं का ?' बीरेश्वरने उलट प्रश्न विचारला.

'हरकत नसल्यास.'

'ऐक सांगतो.' असं म्हणून बीरेश्वर सांगू लागला –

'आजकाल काय आहे, कोणतीही गोष्ट मिळणं भारी कठीण झालंय – अगदी पैसे देऊन देखील. विमानाचं तिकीट घ्यायला जा, चक्क नाही म्हणून सांगतील. पण कोणी मोठा माणूस तुमच्या ओळखीचा असेल तर मात्र हव्वी तेवढी तिकिटं मिळतील. मोठा माणूस ओळखीचा नसेल तर एखाद्या छोटया माणसाला पैसे चारायला हवेत. आता मी पडलो गरीब माणूस. लाचलुचपत माझ्यासारख्याला काय परवडते ? तेव्हा मी काय करतो, एखाद्या महत्त्वाच्या माणसाशीच संधान बांधतो. असे तीन डॉक्टर माझ्या ओळखीचे आहेत. कोणत्याही क्षणी ते मला हॉस्पिटलमध्ये दाखल करू शकतात. मी आपला त्यांच्याशी संबंध ठेऊन आहे. त्यांना प्रत्येक वेळी न चुकता भेट कार्ड पाठवतो, मधून एखादेवेळी त्यांचेकडे चक्कर देखील मारतो – काहीही कारण नसताना. रेल्वेतले दोन मोठे अधिकारीदेखील माझ्या ओळखीचे आहेत. केव्हाही तिकीट हवं असलं की सरळ त्यांच्याकडे जाऊन तिकीट घेऊन येतो. तसंच इलेक्ट्रिक बोर्डातले आणि टेलिफोन एक्स्चेंजमधले एकेक ऑफिसर माझ्या ओळखीचे आहेत. अडल्या वेळी पटकन ते आपलं काम करून देतात. जगणं ही एक कला आहे दोस्ता, ती जाणली पाहिजे.'

हे सगळं पुराण ऐकून घेतल्यावर मित्र म्हणाला –

'ते सारं ठीक आहे रे. पण या चाटरजींचं काय ?'

'तेच तर सांगतोय. माझ्या मामांनी एक पत्र दिलंय ते देऊन आलो आहे. अनायसे चाटरजींशी ओळख होईल. कधीमधी घराला आग लागलीच तर त्यांचा नंबर फिरवला की काम होईल.'

'पण हा फार दूरवरचा विचार झाला. फायर ब्रिग्रेडवाले तर जेव्हा बोलवाल तेव्हा सेवेला हजर असतात.'

मित्र म्हणाला.

'होऽऽ ! मला माहीत आहे. पण ती आजची गोष्ट झाली. उद्याचं कुणी सांगावं ? आजकाल जे चाललंय यावरून वाटतं – केव्हा काय होईल याचा नेम आहे का ?'

□ □ □

# एक होता पृथ्वीराज

सदाशिव कोंडेकर

आता थोडासा मी विचार करू शकतो. पण काल तुझी पत्रिका हातात पडली तेव्हा मी अंतर्बाह्य पेटून गेलो होतो. तुझ्यावर दुसऱ्या कुणाचा हक्क आहे हे मनाला मानवत नव्हते—आजही मानवत नाही पण...असह्य यातना होतात. मन बधीर होऊन जाते.

उषा, आज तुझा आनंदाचा दिवस आहे. ही सकाळची प्रफुल्लित हवा तुला गोंजारीत आहे. डेरेदार कलिका वाऱ्यावर झुलत आहेत. पाकळीपाकळीने उमलत आहेत. क्षणाक्षणाला एक अनोखा सुगंध उधळला जात आहे. जीवनातल्या अद्भूत आनंदाने तू न्हाऊन चिंब होत आहेस.

तुझ्या घरी पाहुण्यांची गर्दी झाली असेल. पुण्याहून तुझी बहीण आली असेल. सांगलीच्या मावशी आल्या असतील. तुझ्या मैत्रिणी आल्या असतील. तुला नाना प्रश्न विचारले जात असतील. त्यातला एखादा तरी माझ्याविषयीचा असेल. आणि त्यामुळेच कदाचित् तुला माझी स्मृती झाली असेल, अनेक विचारांचे सुखद वारे तुझ्या मनात हळुवारपणे वहात असतील. तुझ्या भावी पतीविषयीच तू अधिक विचार करीत असशील. सनईच्या भावमधुर स्वरांनी तुझ्याभोवती फेर धरला असेल. सासरची अनेक कल्पनाचित्र तुझ्या मनात आकारत असतील. सासरच्या राजमहालात राजलक्ष्मी विराजमान झाली असेल, तिथल्या वैभवाने आणि सुख-समृद्धीने तुझ्या पायाशी लोळण घेतली असेल, अशी नानाविध चित्रं तुझ्या मनात उमलत, मिटत असतील.

पृथ्वीराज आठवतो तुला? स्वयंवराच्या मंडपातून संयुक्तेला घेऊन जाणारा प्रेमवीर पृथ्वीराज आठवतो? अगदी तसं तुला त्या लग्नमंडपातून पळवून पसार व्हावं असं वाटतं पण—

तुझ्या भावी पतीच्या विचाराने आणि स्पर्शाच्या मादक कल्पनेनेच तू लाजून बावरी होत असशील. माझी आठवण झालीच तर...तर तू ती झटकून टाकण्याचा

प्रयत्न करशील. निदान आजचा दिवस तरी तुला तसं करावे लागेल. पण मुद्दाम विसरण्याचा प्रयत्न करूनही आठवणी समोर येऊन उभ्या राहात असतील. तीच गोष्ट माझी. मी तुला विसरण्याचा प्रयत्न करतोय पण अनेक आठवणी ताज्या, टवटवीत होऊन मन:सागरातून वर येताहेत.



येऊ नये असा वाईट विचार तुझ्या भावी पतीविषयी येतो. अचानक असं काहीतरी अघटित घडावं अन् अखेर ठरलेल्या वेळी तुझं नि माझं लग्न व्हावं ..असं वाटतं...असं वाटतं !

आपण एकत्र बसत होतो. बोलत होतो. चित्रपटांना जात होतो. चहा देताना, पाणी देताना तुझा मंतरलेला स्पर्श होत होता. रक्तात तराणे छेडून जात होता. एका चित्रपटात नायकाने आपल्या निष्कलंक प्रेयसीवर आरोप करताच तू तिची बाजू घेऊन माझ्याशी फुरंगटून बसलीस. आणि अखेरीस ती निरपराध असल्याचं सिद्ध झालं तेव्हा मला बिलगलीस. तेव्हा तुझा हात कितीतरी वेळ मी घट्ट धरून ठेवला होता. तो बोलका स्पर्श आठवतो तुला ?

एके दिवशी तू चिठी पाठवून बोलावून घेतलं होतंस. आपण रंकाळ्यावर फिरायला गेलो होतो. बागेतल्या हिरवळीवर बसलो होतो. मी म्हटलं होतं, "आज तू गप्प का ?" यावर कसनुसे हसण्याचा प्रयत्न करीत तू म्हणालीस, "कुठ काय ? बोलते ना ?" तुझ्या चेहऱ्यावरचे भाव आणि डोळ्यांची विशिष्ट हालचाल, तू गूढ विचारात आहेस एवढं सांगायला पुरेशी होती.. सूर्यास्त झाला दिवे लागले. फिरायला आलेली माणसं परतू लागली. तरीही तू मला उठू दिलं नाहीस. तुझ्या चेहऱ्यावरचे गंभीर भाव पाहून मी अवाक् झालो होतो. काहीतरी

चुकल्यासारखं वाटत होतं. तू माझ्याजवळ सरकलीस. माझा हात हातात घेऊन म्हणालीस, " आज आमच्याकडे पाहुणे आले होते. "

तुझे चार शब्द चार दिशांनी भाल्यासारखे घुसले. एक भयाण पोकळी निर्माण झाली. दिशा नसलेली निराधार पोकळी गरगरत राहिली. तू निःस्तब्धपणे समोर पाहात होतीस. निळ्या ट्यूबलाईटच्या प्रकाशात तुझा चेहरा अधिकच मलूल दिसत होता. उठता उठता कातर स्वरात पुटपुटलीस, " माझ्या लग्नाचा विचार आहे वडिलांचा. " तू सांगून मोकळी झालीस. पण मी भोवऱ्यात गरगरत राहिलो. अखेर काय म्हणायचं होतं तुला ? मला शेवटचा इशारा द्यायचा होता ना ? कसातरी तुझ्याबरोबर चालत होतो. मनात अनेक विचार थैमान घालीत होते. मी काय करू शकेन याचा विचार करीत होतो. दोघंही गप्प होतो. नेहमीच्या वळणापर्यंत आल्यावर तू माझा हात हातांत घेतलास. घट्ट धरून ठेवलास. तुझ्या डोळ्यांतले अश्रू माझ्या हातावर टपकले. तुझ्या केसांवरून हात फिरवून मी तुझे सांत्वन केले. माझा गळा दाटून आला. विरहाच्या कल्पनेनेच मी पोळत होतो. आतून होरपळत होतो.

ते जोडपे तुला आठवते ? टाऊन-हॉलच्या बागेत आपल्या समोरच्या बाकावर बसले होते. त्यांचे बिलगणे, बसणे तू कौतुकानं पाहात होतीस. तिनं त्याचं नाव काव्यात गुंफलं. मग तुलाही स्फूर्ती आली. तूही बिलगलीस. तूही नाव गुंफलंस. " ज्योतीला मिळाली ज्योत, आता वाढेल प्रकाश, वसंतरावांच्या सहवासात ठेंगणं झालं आकाश ! " ते तुझं नाव घेणं सारखं आठवतंय मला. त्या आठवणीनं खोल–खोल गुदगुल्या होतात. आता मात्र माझं नाव तुला काव्यात गुंफता येणार नाही. तो अधिकार तू आज गमावते आहेस.



तुझ्या एका मैत्रिणीच्या रजिस्टर पद्धतीने केलेल्या लग्नाला आपण दोघं हजर होतो. तेव्हा वाटलं होतं आपणही उरकून घ्यावं. आपण त्या दोघांची थट्टा केली होती. त्यांनी आपली केली होती. त्यांना नाव घेण्याचा आग्रह धरताच त्यांनीही तुला आग्रह केला आणि जणू काय आपलं लग्नच झालं आहे असं समजून तू नाव घेतलंस. तीच मैत्रीण तुझ्या लग्नाला आली असेल. ती निश्चितपणे तुला विचारील " वसंतराव कुठे आहेत ?" तेव्हा तू काय उत्तर देशील ? माझ्या नावाचा संबंध झुरळासारखा झटकून मोकळी होशील.

तुला एक विचारू ? असा तू अनेकवेळा प्रश्न केला होतास. नेमकं विचारायचं तू टाळलं होतंस. काय विचारायचं होतं तुला ? केव्हा विचारणार आहेस ? माझ्या वहिणींची लग्नं, धाकट्या भावाचं शिक्षण, आईचा आजार आणि माझा तुटपुंजा पगार या सर्वांनी माझी पिळवणूक चालविली आहे. आज तूही मला टाकून चाललीस. एका अजस्त्र पोकळीत मी खोल-खोल बुडतोय असं मला वाटतंय.

तुला काय देऊ ? आशीर्वाद ? अनेक लोक आले असतील तुला आशीर्वाद देण्यासाठी – भेटी देण्यासाठी मैत्रिणी आल्या असतील. मी काय आशीर्वाद देऊ तुला ? मी तुझं काय भलं चिंतू ? मासा पाण्याबाहेर काढल्यावर त्याची जी अवस्था होते तशी अवस्था झाली आहे माझी.

एकदा पृथ्वीराजाची गोष्ट मला सांगायची होती. तुला माहीत असूनही सांगायची होती. मी म्हणालो, " एक पृथ्वीराज नावाचा राजा होता. अतिशय शूर होता. " मध्येच मला थांबवीत म्हणालीस, " इतिहासात ना... ?" अस्सा राग आला तुझा, तुला काय म्हणायचं होतं ? मी तुझे केस विस्कटले, तुला उचलून दूर घेऊन गेलो. आणि...पण तू निसटलीस.

तुझ्या लग्न समयाला – बरोबर नऊ वाजून पस्तीस मिनिटांनी – मी तुला आशीर्वाद देईन. एक धारदार चाकू माझ्या हातात आहे....ठीक नऊ वाजून पस्तीस मिनिटांनी...' सु...खी...भ...व. '



केशव मेश्राम

# पुस्तके

## तुलसीदल

### स्वत्वहीन व अतिसामान्य काव्यसंग्रह

'तुलसीदल' हा अंजली ठकार यांचा पहिलाच कवितासंग्रह. हे मौज प्रकाशनाचे १९३ वे पुस्तक. या संग्रहामध्ये ठकारबाईंच्या १९५४ पासून तो १९७० पर्यंतच्या काळातील निवडक अशा ६७ कवितांचा समावेश केला आहे.

या सतरा वर्षांच्या कालखंडात मराठी कवितेत अनेक स्थित्यंतरे घडली. काही रचनाप्रकाराच्या बाह्यांगाबाबतची होती तर काही आशयाच्या प्रकाराची. अनेक समर्थ नावे याच काळात पुढे येऊन स्थिर झाली. कित्येक दुय्यम श्रेणीचे मानकरीही आपला दबदबा टिकवून ठेवण्यात यशस्वी ठरले.

'तुलसीदल'मधील कवितांच्या वाचनात मराठी कवितेच्या चढउताराचा आलेख अनुभवता येतो. रचनेचे घाट आणि शब्दांच्या जडणघडणीचे लोकप्रिय व 'कविप्रिय प्रकार अंजलिबाईंच्या संग्रहात अंतर्भूत झालेले दिसतात. जीवनलहरी, अष्टाक्षरी, मुक्तके, अभंग, व गीतपद्धतीची, गझलाकडे जाणारी, यमकांचा सोस असलेली ही कविता वाचताना अनेक संमिश्र विचार रसिकमनात उठतात. ठळकपणे जाणवते ते असे, की सतत सतरा किंवा त्याहूनही अधिक वर्षे लेखन करूनसुद्धा अंजली ठकार स्वतःचा असा पुसटसाही ठसा उमटवू शकत नाहीत. वस्तुतः प्रभा जुमडे (म्हणजे आताच्या सौ. ठकार) यांच्या कवितांबद्दल बऱ्याच अपेक्षा होत्या. पण संग्रहात आलेली त्यांची कविता विरस करणारी आहे.

१९५४ ते १९६० पर्यंतच्या सात वर्षांतील एकूण १७ कविता आढळतात. त्यांतही १९६० सालाची एकही कविता नाही किंवा ती संग्रहसमावेशयोग्य ठरलेली दिसत नाही. 'वाट तुझी' ही आरंभीच्या काळातील एक उल्लेखनीय कविता. पहिल्या प्रतीक्षेच्या क्षणांची कोवळिक त्यात शब्दांकित केली आहे. संध्येने केलेला शृंगार, हिरवळीवर (हिर्वळीचा हे थोडे काव्यत्मकच!) भानहीन वाऱ्यातून उडणारा पदर आणि अखेरीचा अंधार व एकटेपण यांमुळे कविता लक्ष वेधून घते. 'शाप' 'मेघ मौनाचा झरेना' आणि 'निरोप' या कवितांतील शक्ती व सामर्थ्य पारंपारिक प्रतिकांनी बोथट करून टाकले आहे. मौनाचा मेघ, धुंदीचा मोर, गंधाची

नशा, स्वप्नांची आंबराई, राघूची साद आणि चातकाची तहान किंवा उनाड वारा, उतू जाणारा केवडा, उफाडयाची वेल, खवट झिपरी नारळी या 'पुराण कालीन' शब्दांनी कविता खिळखिळ्या होतात.

सबंध संग्रहात समाधान देणाऱ्या फक्त तीन कविता आहेत; कवयित्रीचा सूर ज्यांतून समजू शकतो अशा. एक आहे 'प्रार्थना'. वैयक्तिक भावानुभव, सामाजिक वैफल्य आणि मानवतेची अगतिक शरणागती एका पिळातून साकार करण्यात कवयित्रीला यश लाभले आहे. वास्तविकपणे ज्यांचा विकास व्हावा अशी कित्येक व्यक्तिमत्त्वे अकालीच आकसतात. फुलण्याऐवजी उकिरडयावरचे बरबटलेपण व त्याचेच वाटप करणारी नियती हा जो घास घेते तो तरी अज्ञात अशा परमात्म्याला पोचावा आणि 'फुलातून फुटणाऱ्या रसरशीत फळांसारखे ठसठशीत व्यक्तिमत्त्व उदित व्हावे' अशी ही प्रार्थना. यमकाच्या प्रीतीमुळे ह्या कवितेतही उकीर-फकीर जरठ-तरट अशी यमके रसभंग करून जातातच.

'वेढल्या बाहूत' या कवितेत कवयित्रीच्या उत्कट अनुभवांचे प्रत्यंतर येते. समर्पणाची शक्ती, सर्वस्व झुगारण्याची जिद्द आणि गतिमान शब्दकळा यांमुळे ही कविता वेधक व प्रभावी उतरली आहे.

'पार केली वाट काळाची पहाडी;
पाहतें कधी वळुन मागे मीच वेडी.

या ओळीतील आवेग स्त्रीहृदयाची स्वाभाविकता व्यक्त करतात तर कवितेच्या समारोपातील,

मैल मृत्यूचा सुरू हो, कोण ये येथे रहाण्या;
सैल थोडे देह सोडू, कोण ये येथे पहाण्या;
वेढल्या बाहूत श्वासांनी कथू या
एकमेकां जन्मजन्मांच्या कहाण्या

या ओळी दीर्घकाळ मनात उद्घोषित होत राहातात. 'कलेवर' ही या संग्रहातील तिसरी चांगली कविता. कविमनाची उलघाल आणि एक मनस्वी अनुभव अंजली ठकार यांनी प्रामाणिकपणे व सहजतेने आविष्कृत केला आहे.

कोणाचा तरी आधार, कुणीतरी सोसलेली झीज हीच शरीराच्या तगवण्यातून, जगण्यातून कवयित्रीला सांगायची आहे. शरीराचा स्वभिमान नेता मेलेल्या देशासारखा पोरका बनला आहे. अक्षरांतून कृतज्ञतेची भावना परिपूर्णतेने अभिव्यक्त होत नाही. पण सरावानेच कापरी-क्षीण अक्षरे खरडली जातात. आता दुःखावरही दुसऱ्या कुणाचा तितकाच अग्रहक्क असल्यामुळे त्या जीवघेण्या गलबतावर परतावे लागते. कवितेच्या शेवटी कवयित्रीने कविता अधिक बंदिस्त व आशयघन केली आहे. नव्हे तिला स्वतःचाच असा एक आटोपशीर 'आकार' गवसला आहे. शेवट आहे—

'अश्रूंनी जखमा चाटणारे तुझे बलवत्तर आकाश
आहेच नेहमीचे माथ्यावर



ही पहा-
कपडे धुण्यासाठीं
डिटर्जंट शक्तिशाली वडी
कपडे कितीहि चोळले तरी स्वच्छ निघतच नाहीत मुळी. मला वाटतं, या पाण्यामुळें होय असावं असं.
अग, पण मी याच पाण्याने धुते ना कपडे ? मग माझे कपडे कसे स्वच्छ निघतात? हं, पण मी साबण मात्र वापरीत नाही.
असं ! मग वापरतेस तरी काय तू !
आता मिळू लागलेली डेट डिटर्जंट वडी.
काय असते तीत एवढं !
तिच्यात असते डिटर्जंट शक्ति. तिनं फेस तर चांगला येतोच पण शिवाय साबणापेक्षा ती कितीतरी प्रभावी असते. तिनं कपडे स्वच्छ नि उजळ निघतात. नीळ किंवा इतर काही वापरण्याची आवश्यकता नसते.
अगदी खरं ! डेट डिटर्जंट वडीने साबणापेक्षा दीडपट कपडे धुतले जातात. त्यामुळे तिचा वापर करणे खूप काटकसरीचं होतं !
NEW! det
डेट डिटर्जंट वडी
५०% कपडे अधिक धुणारी
अन् तेही साबणापेक्षा आधिक शुभ्र.
पाणी कसेहि असो–अगदीं क्षारयुक्त असलें तरी !
स्वस्तिक ऑईल मिल्स, मुंबई

म्हणूनच प्राणापलीकडे जतन करते
शरीराचे हे कलेवर.'

असा प्रत्ययकारक व प्रभावी.

'प्रार्थना','वेढल्या बाहूत' व 'कलेवर' या तीन कविता ही 'तुलसीदल संग्रहातील बेरजेची विशेष बाजू.

अभंगाचीही संख्या 'तुलसीदल' संग्रहात बरीच आहे. खरे म्हणजे या वृत्ताच्या लवचिकतेमुळेच खऱ्याखोटया कवितांची प्रचंड गल्लत होताना दिसते. अगदी ग. ह. पाटील, मर्ढेकर, करंदीकर, केचे, शिरीष पै किंवा आजचे कित्येक शब्दांशी लडिवाळपणा करणारे ह्या अभंगाच्या अखंड आभासात अडकलेले दिसतात. अंजली ठकार यांनाही अभंगांनी चकवले आहे. 'सुखासाठी साऱ्या' 'रडा अर्भकांनो' 'कुणी कुणासाठी' 'असे जाता जाता' आणि 'किती काळ' हे चांगला आरंभ व नंतर नुसता पसारा असलेले अभंग. 'आतडयाची पीडा' 'तोच' 'आम्हीच पाडतो' व 'चालले आमुचे' यातील उपरोधाचा सूरही ठकारबाईंना न पेलल्यामुळे त्याही अभंगातून अपेशच त्यांना लाभले आहे.

रचनेच्या सौष्ठवाबद्दलही अंजली ठकार यांच्या काही खास लकबी जाणवतात. त्या काव्यगुणांमध्ये भर न घालता दोषास्पदच व क्वचितप्रसंगी नकली, खोटया आणि हास्यास्पदही ठरतात. काही मासले बघण्यासारखे आहेत.

'झोप' कवितेतील—

'हा आहे एक खास मामला
जेथे उमलत्या कमलाचे आलीशान इमले असतात
आणि आत्म्याचे भ्रमर
उमरभर निर्भरपणे गुंजारव करू शकतात
अजरामर वारा विनम्रपणे छत्रचामर ढाळीत असतो.

'दिशाहीन माशा' मध्ये


(अ) कुठे तुंबलेले दिसे आंबलेले,
असे झोंबती की फुटे रांजण.
(आ) पिढया अन् पिढया ओढि पैशांध गाडया
बडयांच्या सदा ठासलेल्या मुखे.

अशाच शब्दांत हरवलेल्या, ना काव्य ना निवेदन अशाच त्रिशंकू अवस्थेत केविलवाणेपणे लटकणाऱ्या कवितांची संख्या फार मोठी आहे. द्विरुक्त शब्द, पुनरुक्त, आम्रेडित यांचाही ठकार यांना सोस आहे. उटारेटा, धडेपवाडे, मोकळेढाकळे, वेडावागडा, आमोदप्रमोद अशीही एक यादी सादर करता येईल.

एकूण 'तुलसीदल' वाचल्यानंतर विलक्षण निराशा पदरी पडते. मौज प्रकाशनाचे नाव असल्याने तर फारच अपेक्षाभंग होतो. ◻

तुलसीदल : अंजली ठकार : मौज प्रकाशन गृह, मुंबई : किंमत ५ रुपये.

# जनरल जिरॉदचे धाडसी पलायन....



---

**पूर्वार्ध : निवेदन : अनंत भावे**

---

दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीला जर्मन फौजांनी विद्युत्‌वेगाने युरोपातील देश एकामागून एक पादाक्रांत केले. या मोहिमांतून अक्षरशः हजारो दोस्त सैनिक युद्धकैदी म्हणून गजांआड गेले. तुरुंगात जाऊनदेखील या सैनिकांना आपल्या कर्तव्याचा विसर पडला नव्हता. तुरुंगातून पळून जाणे, जर्मनांची सुरक्षा-व्यवस्था कमजोर करणे, त्यांच्या नीतिधैर्यावर आघात करणे, हे युद्धकैद्यांचे प्रधान कर्तव्य मानले जात होते. या कर्तव्याची हाक ऐकून कितीतरी युद्धकैद्यांनी, अक्षरशः आपले जीव संकटात घालून, मुक्त होण्याचे यशस्वी वा अयशस्वी प्रयत्न केले. दुसऱ्या महायुद्धाच्या विलक्षण नाटयपूर्ण महाकाव्यातील एक रोमहर्षक पर्व या पलायनकथांचे आहे. जनरल जिरॉद्‌ या फ्रेंच जनरलच्या सनसनाटी पलायनकथेचा हा अनुवाद. मूळ लेखक आहेत : फ्रेड वॉर्‌शॉफ्‌स्की.

झुपकेदार मिशांचा, बारीक कापलेल्या करड्या केसांचा तो उंचापुरा म्हातारा फ्रेंच मनुष्य दरवाजाच्या आत अगदी उंबरठ्यापाशी निश्चल उभा होता. हातमोजे घातलेल्या त्याच्या हातांत दोराचे एक भलेमोठे गुंडाळे होते. पुडक्यांवर बांधलेल्या दोराच्या शेकडो तुकड्यांपासून मोठ्या कष्टाने विणलेला तो दोर त्याच्या दृष्टीने फार मोलाचा होता. दरवाजाच्या बाहेर एक दगडी सज्जा होता. या दगडी सज्जा- खाली दीडशे फूट खोल उभाच्या उभा कडा होता. कड्याखाली कठीण खडबडीत भूमी होती.

कॉनिग्सटाईन किल्ल्याच्या उत्तर सज्जामधून घरंगळत येणारा पावलांचा लयबद्ध आवाज त्या म्हाताऱ्याने ऐकला. पहारेकरी आता जवळ येत होता. त्याची सावली उंबरठ्यावरून आत आली, आणि म्हातारा एकदम भिंतीला बिलगला. परंतु पहारेकरी तसाच निघून गेला. त्याच्या रुंद पाठीवर गडद हिरव्या रंगाचा गणवेषी कोट ताणून बसला होता. हात हलविताना त्या कोटाला लहान लहान सुरकुत्या पडल्या होत्या. त्याच्या उजव्या खांद्यावर असलेल्या संगीनीचे पाते सूर्यप्रकाशात लख्कन् लकाकले. क्षणभर म्हाताऱ्याचे डोळे दिपून गेले. तो पहारेकरी पुढे जाऊन वळला आणि अदृश्य झाला.

तो म्हातारा फ्रेंच मनुष्य घाईघाईने सज्जामध्ये आला. त्याच्या दगडी कठड्याला त्याने चपळाईने दोराचे एक टोक बांधले; हिसका देऊन दोर-गाठ पक्की बसली आहे याची खात्री करून घेतली; आणि लगोलग दोर हवेतून खाली फेकला. मग त्याने कठड्यावर एक पाय टाकला; कानोसा घेत तो क्षणभर थांबला; नंतर त्याने दोर घट्ट पकडला; आणि खाली उतरायला सुरुवात केली.

हातमोज्यांचा काहीच उपयोग होत नव्हता! एखाद्या तारेप्रमाणे चिवट झालेल्या त्या दोराने हातमोजे फाडून म्हाताऱ्याचे तळहात फाडायला केव्हाच सुरुवात केली होती. त्याच्या हातांची आग आग होऊ लागली. वेदनेने तोंडातून नकळत किंकाळी बाहेर पडेल, अशी भीती त्याला वाटली. पण त्याने ओठ घट्ट आवळून धरले; खरबरीत कड्याला गाल टेकून काही क्षण त्याने विसावा घेतला; धडधडणाऱ्या छातीत हवा भरून घेतली; आणि पुन्हा कडा उतरायला सुरुवात केली.

## गुंतागुंतीची योजना

त्याचे वय थोडेथोडके नव्हते : आयुष्याची चांगली चत्रेसष्ट वर्षे उलटली होती. जर्मनांच्या तुरुंगातील हा सर्वांत महत्त्वाचा कैदी असावा. त्याचे नाव हेन्री ऑनोर जिरॉद् असे होते, आणि तो फ्रेंच सेनेत जनरलच्या हुद्द्यावर होता!

१० मे १९४० रोजी जर्मन पायदळ आर्देनेजच्या अरण्यात घुसले. त्यांच्यापुढे रणगाड्यांनी बऱ्याच दूरवर मुसंडी मारली होती. रणगाड्यांच्या माऱ्यामुळे विकल झालेल्या फ्रेंचांचा उरलासुरला प्रतिकार पायदळाने संपुष्टात आणला. लाओनपुढील दोस्तांच्या फौजेचे सेनाप्रमुख असलेले जिरॉद् तत्परतेने रणभूमीवर येऊन जर्मनांचा

हल्ला कोठे थोपविता येईल याची पाहणी करीत होते. परंतु अविरत होणाऱ्या तोफमाऱ्यामुळे एका मशिनगनच्या घरट्यामध्येच त्याना आश्रय घ्यावा लागला.

इकडे जर्मन पायदळाने वेगाने पुढे घुसून तो प्रदेश पादाक्रांत केला होता. त्या वेळी एका जर्मन अधिकाऱ्याला मशिनगनच्या त्या घरट्यात अवघडून वसलेल्या या महत्त्वाच्या युद्धकैद्याचा शोध लागला. या उंच्यापुऱ्या आणि झुबकेदार करड्या मिशा ठेवणाऱ्या युद्धकैद्याच्या टोपीवरती पाच तारे झळकत असून ते त्याच्या जनरलच्या हुद्द्याची ग्वाही देत होते. येणेप्रमाणे दोन महायुद्धात, दुसऱ्या वेळेला हेन्री जिरॉद् जर्मनांचा युद्धकैदी झाला होता.

जिरॉद्ची कारकीर्द कळसाला पोचली असतानाच युद्धकैदी होण्याचा लाजिरवाणा प्रसंग त्याच्यावर आला होता. असामान्य कर्तृत्वाच्या या फ्रेंच सैनिकाचे नशीबच मोठे खडतर होते. पहिल्या महायुद्धात, चार्लेरॉय येथे, संगीन-माऱ्याच्या एका हातघाईच्या चकमकीत ऐनवेळी तो जखमी झाला. तो मेला असे समजून फ्रेंचांनी त्याला मदत देण्याचा काहीच प्रयत्न केला नाही. अर्धमेल्या झालेल्या जिरॉद्ला जर्मनांनी तडक बेल्जियममधील एका युद्धकैद्यांच्या छावणीत रवाना केले. परंतु जखमा पूर्ण बऱ्या होण्याआधीच जिरॉद्महाराज जर्मनांच्या तोंडाला पाने पुसून तुरुंगातून निसटून गेले होते.

पण त्याला आता उणीपुरी २५ वर्षे लोटली होती. दोन युद्धांमधील जखमांमुळे त्याचा एकेकाळचा दणकट देह कमजोर झाला होता; आणि वयाने तर साठी ओलांडली होती. पळून जाण्यासाठी सळसळत्या तारुण्याची गरज त्याला होती आणि तेवढी एक गोष्ट मात्र हेन्री जिरॉद्कडे नव्हती. हुशारी आणि हिकमत एवढी दोनच साधने त्याच्याजवळ होती. त्याबरोबर अर्थात सैनिक म्हणून आयुष्यभर घेतलेले शिक्षणही होते. या शिक्षणात कर्तव्याला सर्वांत अधिक किंमत होती आणि जिरॉद्ला त्याचे कर्तव्य स्पष्ट दिसत होते : पलायन !

त्याचा पळून जाण्याचा निर्धार निश्चित होता. परंतु कॉनिग्स्टाईन किल्ल्यामधून पळून जाणे ही साधीसुधी गोष्ट नव्हती. एकतर हा किल्ला सरळसोट, दुर्लंघ्य अशा कड्याच्या टोकावर होता; आणि दुसरे म्हणजे या किल्ल्यामध्ये बंदोबस्ताची व्यवस्था अत्यंत चोख होती—प्रत्येक प्रवेशद्वारावर दुहेरी अडथळे होते आणि दर दहा मिनिटांनी पहारेकऱ्याची फेरी व्हायची.

गेली जवळजवळ दोन वर्षे हेन्री जिरॉद् आपल्या सुटकेच्या साधनांची जमवाजमव करीत होता. त्यासाठी त्याला अत्यंत गुंतागुतीची योजना आखावी लागली होती. जर्मन भाषा त्याला आधीच येत होती; परंतु ती भाषा बोलताना त्याची परकीय लकब लपत नव्हती. आता प्रयत्नपूर्वक त्याने ती लकब नाहीशी केली होती. भोवतालच्या परिसराचा एक नकाशा त्याने मिळविला होता, आणि अभ्यासपूर्वक

त्या परिसरातील छोटीमोठी ठिकाणे लक्षात ठेवली होती. तुरुंगातून सुटका झालेल्या एका कैद्याने जिरॉद्च्या सुटकेच्या योजनेबद्दलचा सांकेतिक निरोप पॅरिसमध्ये त्याच्या बायकोला कळविला होता. परिणामी फ्रेंच भूमिगत कार्यकर्त्यांनी जिरॉद्चे बनावट कागदपत्र करायला ताबडतोब सुरुवात केली होती.

## मिशांचे उच्चाटन

आज १७ एप्रिल १९४२ रोजी त्या उंच पर्वतकड्याच्या अर्ध्यावर येऊन, जिरॉद्, आपल्या जाळ्याच्या एखाद्या धाग्याला धरून लोंबकळणाऱ्या प्रचंड कोळ्यासारखा, मध्येच लटकत होता. तो कडा त्याला संपूर्ण उतरायचा होता. हाताखाली हात घेत जिरॉद हळूहळू उतरत होता. त्याच्या हातांना रग लागली होती. वेदना असह्य होत होत्या. खरे म्हणजे त्या वेदना सहन करण्याची शारीरिक शक्ती त्याच्यात उरली नव्हती. केवळ इच्छाशक्तीच्या जोरावर त्याचा प्रयत्न चालू होता. एका हाताने दोर सोडायचा, तो हात उचलून दुसऱ्या हाता-खाली ठेवायचा, आणि त्याने दोर पकडल्यावर वरचा हात सोडाचा, अशी त्याची लयबद्ध हालचाल चालली होती.

मध्येच जिरॉद्ने खाली पाहिले. ज्या जागी तो उतरणार होता तेथे अणुकुचीदार दगड होते. त्याने गपकन् डोळे मिटून घेतले. आणि दोरावरील आपली पकड अक-स्मात ढिली झाली आहे असे त्याच्या लक्षात आले. हातामधील कातडी हातमोजे फाडून दोर त्याच्या तळहाताच्या मांसल भागात रुतून घासपटत होता. त्याने मोठ्या निर्धाराने वेदनांवर काबू मिळवला आणि हातांची पकड घट्ट केली. क्षणभर तो दोरावरतीच तळापासून २० फूटांवर, लटकत राहिला. मग हळूहळू शिस्तबद्ध, पद्धतशीरपणे तो खाली आला. अखेर त्याचे पाय जमिनीला लागले.

कड्याच्या पायथ्याशी म्हातारा जिरॉद् काही क्षण विसावला; त्याची नजर अभावितपणे वर कॉनिग्सटाईनच्या भव्य किल्ल्याकडे गेली. थोड्याच अवधीत तो पळाल्याचे कोणालातरी समजणे अटळ होते. त्यामुळे त्वरा करणे जरुरीचे होते. मोठ्या कष्टाने जिरॉद् उठला आणि धडपडत उतारावर जवळच असलेल्या एका झाडोऱ्यापाशी गेला. तेथे पोचल्याबरोबर त्याने आपले अंग जमिनीवर झोकून दिले आणि काही काळ विश्रांती घेतली. अखेर तो उठून बसला. कमरेवर लटक-णारे एक गाठोडे काढून ते त्याने सोडले. गाठोड्यात एक पावसाळी कोट होता; एक टिरोलिनची हॅट होती; आणि काही चॉकलेटचे तुकडे होते. मग आपल्या निळ्या गणवेषाच्या खिशामधून जिरॉदने वस्तरा काढला आणि वेदनेने कळवळत असतानाच घाईघाईने आपल्या झुबकेदार मिशा खरवडून काढल्या. सुटकेच्या सगळ्या योजनेमध्ये हीच गोष्ट मोठी कठीण वाटत होती त्याला. कारण त्याच्या झुबकेदार मिशा हा त्याच्या सहकाऱ्यांच्या मत्सराचा विषय होता.

इतक्यात किल्ल्यावरून तरंगत आलेले शब्द जिरॉदच्या कानांवर पडले. जिरॉद्

पळाला – जिरॉद् पळाला.'

ताबडतोब जिरॉद्ने वस्तरा खिशात खुपसला. तो झाडीतून बाहेर आला आणि एका अरुंद पायवाटेने चालू लागला. शक्य तितक्या वेगाने चालण्याचा प्रयत्न तो करत होता. दक्षिणेला पाच मैलांवर असलेल्या स्कांदाव या शहरात त्याला पोचायचे होते. पूर्वसंकेतानुसार एक माणूस त्याला तेथे भेटणार होता.

पण तो माणूस निश्चित तेथे भेटेल काय? जिरॉद्च्या मनात विचार आला. कारण तो आणि त्याची पत्नी यांच्यामध्ये चालणाऱ्या, वरवर पाहता अत्यंत निरुपद्रवी अशा घरगुती पत्रव्यवहारातून गुंफलेल्या सांकेतिक संदेशांच्या साहाय्याने त्याच्या पलायनाची सारी योजना सिद्ध झाली होती. आपली काही चूक तर झाली नसेल ना, असे जिरॉद्ला वाटले; आणि हा विचार एखाद्या दुखऱ्या दाताप्रमाणे त्याच्या मनाला छळत राहिला. आपण एक दिवस लवकर वा उशिरा तर पळालो नाही ना? पण निग्रहपूर्वक ही भीती त्याने मनातून काढून टाकली. १७ एप्रिल हाच दिवस त्याने ठरवला होता.

पायवाटेने जिरॉद् वेगात चालला होता. सूर्य आता वर आला होता, आणि घामाचे ओघळ जिरॉदच्या पाठीवरून ओघळत होते. समोर रस्त्याच्या बाजूला एक छोटीशी इमारत त्याला दिसली. बापरे, ही सैनिकांची बरॅक तर नसेल ना, अशी भीती त्याला वाटली. कोणी पाहील म्हणून तो खाली वाकला आणि खुरडत पुढे सरकू लागला. इमारतीच्या आवारात कोणी तरुण मुलगी झाडू मारत होती आणि इमारतीच्या एका बाजूवर मोठ्या अक्षरांत 'खाणावळ' असे लिहिले होते. एकूण सैनिकांची बरॅक नसून साधी खाणावळ होती ती. आता जिरॉद उठून उभा राहिला. आपल्याला दबतदबत येताना कोणी पाहिले तर त्याला संशय यायचा; त्यापेक्षा बेफिकीरीने वागल्यास कदाचित् कोणाचेच आपल्याकडे लक्ष जाणार नाही, असे जिरॉद्ला वाटले.

तो रस्त्यावर आला आणि खाणावळीकडे चालू लागला.

'गुड मॉर्निंग' ती तरुण मुलगी त्याला पाहून म्हणाली.

'गुड मॉर्निंग' जिरॉद त्या मुलीचे बारकाईने निरीक्षण करत म्हणाला.

'तुम्ही फारच दमलेले दिसता' मुलगी हसून म्हणाली, 'आत येऊन काही पेय का घेत नाही तुम्ही?'

'जरूर घेतलं असतं; पण काय करू? आताच उशीर झाला आहे मला.' जिरॉद्ने उत्तर दिले आणि आपल्या कोरड्या पडलेल्या, धुळीने माखलेल्या ओठांवरून जीभ फिरवली. छे. छे. तुरुंगापासून इतक्या जवळच्या या खानावळीत दारूचे घुटके घेत बसणे त्याला कसे शक्य होते? जर्मनांनी एव्हाना त्याचा पाठलाग चालवला असण्याचा संभव होता. त्यामुळे त्याला त्वरा करणे क्रमप्राप्तच होते.

अकस्मात सकाळची हळुवार शांतता एका रटरटत्या आवाजाने उध्वस्त झाली. जिरॉद् गर्कन वळला आणि आवाजाच्या दिशेने रोखून पाहू लागला. दुतर्फा झाडे असलेल्या त्या रस्त्यावरून, दुरून, कोठून तरी, एखाद्या घुमटामध्ये घुमणाऱ्या आवाजासारखा तो आवाज जवळ जवळ येत होता. तसा आवाज फक्त जर्मन फटफटीचा होतो, हे जिरॉदला ठाऊक होते. तो वळला आणि त्या मुलीला म्हणाला, 'ठीक आहे. तू म्हणालीस त्याप्रमाणं काहीतरी घ्यावं असं वाटू लागलं आहे मला.'

'छान. हे छान झालं.' ती मुलगी म्हणाली.

खानावळीत बरीच काळोखी होती. गारवादेखील पुष्कळच होता. जिरॉद् एका अंधाऱ्या कोपऱ्यातील टेबलाशी जाऊन बसला. या जागेवरून त्याला खिडकीबाहेर पाहून रस्त्यावर नजर ठेवणे शक्य होते. रस्त्यावरून दोन फटफटया रोरावत गेल्या. त्यांच्यामागून सैनिकांनी भरलेली एक उघडी ट्रक होती. त्या मुलीने गरम गरम कॉफी आणून जिरॉद्पुढे ठेवली. 'ही फ्रेंच कॉफी आहे.' ती म्हणाली, 'कॉफी करावी तर फ्रेंचांनीच. माझ्याकडे रशियन व्होडकासुद्धा आहे. बघा तुम्हाला हवी असेल तर.'

'नको. कॉफीच पितो मी. दुसरं काही नको मला' जिरॉद् म्हणाला. दरम्यान त्याचे डोळे खिडकीवर खिळलेले होते. सैनिकांनी भरलेली ती ट्रक थोडी पुढे जाऊन थांबली होती. पोलादी शिरस्त्राणे घातलेले ते सैनिक रस्त्यालगतच्या अरण्यात जिरॉद्चा शोध घ्यायला सिद्ध झाले होते.

ती तरुणी दाराजवळ गेली आणि दाराबाहेर डोकावत म्हणाली, 'या इथं हे मेले. सैनिक काय करताहेत कोण जाणे?'

'त्यांचा कवायतीचा भाग असेल काही' जिरॉद मनात वाटत नसलेली बेफिकिरी शब्दांत आणण्याचा प्रयत्न करीत म्हणाला,

'असेल बाई. पण सारखं आपलं युद्ध युद्ध आणि युद्ध. युद्धाचा विसर म्हणून पडून देत नाहीत.'

जिरॉद्ने तिच्याकडे पाहिले. तिला काही संशय आलेला नाही ना, याची शहानिशा त्याला करायची होती. पण ती तर बिचारी शांत आणि निर्भर दिसत होती. पुन्हा त्याने खिडकीला डोळे लावले. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना सैनिक ओळ करून उभे होते. पद्धतशीरपणे रस्त्याच्या दोन्ही बाजूंचे जंगल ते शोधणार होते. खानावळीमध्ये शोध करण्याचा मात्र त्यांचा विचार नसावा.

इतक्यात एक सैनिक आपला सरळ उठला तो रस्ता ओलांडून खानावळीकडेच येऊ लागला. जिरॉद् हलकेच आपल्या खुर्चीवरून उठला आणि अधिकच अंधाऱ्या कोपऱ्यात सरकला. मुलगी आधीच दरवाज्यापाशी गेली होती. तो सैनिक आता उंबरठ्यापाशी उभा राहिला. त्याची गडद काळी सावली जमिनीवर पडली होती.

जिरॉदचे सारे शरीर एकदम ताठ झाले. या सैनिकाने गोळी झाडण्यापूर्वी किंवा हाकाटी करण्यापूर्वीच त्याला लोळवावा काय, असा विचार क्षणभर त्याच्या मनामध्ये आला. त्या मुलीला कितपत संशय आला आहे, यावर त्याची हालचाल अवलंबून होती.

'मग आज रात्री त्याचवेळी भेटायचं ना लायसेल ?' सैनिकाने विचारले.

'एरिक, तू म्हणशील तसं.' मुलीने उत्तर दिले.

'मला वाटलंच होतं तू असं म्हणशील म्हणून. आता मात्र थांबत नाही मी एका पळून गेलेल्या फ्रेंच कैद्याला शोधतो आहो आम्ही. भला मोठा झुबकेदार मिशांचा कैदी आहे हा. तुझ्या तर नाही ना दृष्टीला पडला तो कुठं ?'

क्षणभर जिरॉद अगदी गोठून गेला. मग तत्परतेने त्याने आपली जागा पकडली.

मुलगी जिरॉदकडे वळून त्या सैनिकाला म्हणाली, 'नाही बाबा. फक्त हा माणूस तेवढा आला आहे इथं.'

जिरॉद आणि कॉफी पिण्यात मग्न झालो आहोत असे दाखवत होता. पण मनातून मात्र, एखादे हत्यार आपल्याला ताबडतोब कसे मिळवता येईल, याचा विचार तो करत होता. सैनिकाने संशयाने कोपऱ्यात नजर टाकली. बंदुकीवरील त्याच्या हाताची पकड घट्ट झाली. इतकेच नव्हे तर त्याचे बोटही चापावर स्थिर झाले.

अचानक लायसेलला हसू फुटले. हसत हसतच ती म्हणाली, 'कमाल आहे तुझी एरिक; हा माणूस काय तुझा पळालेला कैदी वाटला तुला ? कमालच आहे तुझी. त्याला मिशासुद्धा नाहीत बघ.'

एरिक तोपर्यंत टेबलाजवळ पोचला होता. जिरॉदने त्याच्या आणि आपल्यामधील अंतर मोजले. त्याच्या रक्ताळलेल्या हातांच्या मुठी आपोआप वळल्या गेल्या. तो सैनिक आणखी थोडा पुढे यायचा अवकाश की–

'कोठल्या गावचा आहेस तू ?' सैनिकाने अचानक विचारले.

'म्युन्शेन' जिरॉद्ने तात्काळ उत्तर दिले, 'माझ्या बहिणीला भेटायला निघालो आहे मी.' आपल्या निर्दोष जर्मनमध्ये जिरॉद् म्हणाला.

तो सैनिक तेथेच थांबला.

'लायसेल, तू म्हणतेस ते खरं आहे. हा काही आमचा पळालेला फ्रेंच कैदी दिसत नाही. त्या फ्रेंच कैद्याला असं जर्मन थोडंच येणार आहे ?' असे म्हणून तो सैनिक लायसेलकडे वळत उद्गारला, 'लायसेल, मला त्याच्या शोधाच्या कामासाठी गेलं पाहिजे आता; नाहीतर तो सार्जंट शंख करायचा माझ्या नावानं बरं आहे म्हातारबाबा. प्रवास मजेत होवो तुमचा.'

लगेच तो खानावळीबाहेर पडला.

## स्कांदाव शहरात प्रवेश

एक क्षणभर जिरॉद् अगदी निश्चल बसला. सुटकेचा आनंद त्याने आपल्या शरीर-



" कोठल्या गावचा आहेस तू ?"
' मुन्शेन.' जिरॉद्ने तात्काळ उत्तर दिले.

भर सावकाश पसरू दिला. मात्र त्याला त्या मुलीबद्दल अजून विश्वास वाटत नव्हता. त्या जर्मन सैनिकाने आपल्या मनातील संशय तिच्या मनात पेरला असण्याची शक्यता होती. म्हणून काहीतरी विचारायचे यासाठी त्याने तिला विचारले, ' हा आता आला होता तो छोकरा तुझा खास मित्र दिसतोय ?'

' होय. पण म्हातारबाबा तो इकडे आला होता हे सांगू नका हं कोणाला. ' लायसेल आर्जवाने म्हणाली, ' नाहीतर त्याच्यावर नसती बला यायची. '

' छे. छे. मी कशाला कुणाला सांगायला जातोय ?' जिरॉद आनंदून म्हणाला.

मग त्याने पुन्हा खिडकीबाहेर पाहिले. शोध करणारे सैनिक खानावळीपासून पुष्कळ दूर गेले होते. बाजूच्या दाट जंगलात जिरॉद्चा शोध त्यांनी चालविला होता. आणखी एकदोन मिनिटांनी निघायला हरकत नव्हती.

खाणावळ सोडल्याला आता बराच वेळ झाला होता. जिरॉद्सारखा चालतच होता. अखेर त्याला हवा होता तो पूल समोर दिसू लागला. त्या पुलापलीकडे

स्कांदाव शहर होते. जिरॉदला तिथे जायचे होते. पूल दिसताच तो क्षणभर उभा राहिला. त्याने हातरुमाल काढून कपाळावरचा घाम पुसला. रेनकोटाची बाही मागे करून घड्याळाकडे पाहिले. जवळजवळ एक वाजला होता. सारे काही ठरल्याप्रमाणे घडले तर त्याला भेटणारा माणूस इतक्यात तेथे येणार होता.

थोड्या वेळाने जिरॉद् पुलाच्या कठड्याला रेलून उभा राहिला आणि आपली हुरहुर शमवण्याचा प्रयत्न करू लागला. बनावट कागदपत्र आणि साधा पोशाख यामुळे जर्मनीबाहेर पडण्याची थोडीतरी शक्यता होती. परंतु त्या क्षणी मात्र त्याला सुटकेची यत्किंचितही आशा वाटत नव्हती. त्याच्या सुटकेमध्ये असंख्य अज्ञात अडचणी होत्या. परंतु आता त्या अडचणींची भुतावळ उठवणे शहाणपणाचे नव्हते. त्यामुळे सारे विसरून सुटकेचा सर्व शक्तिनिशी प्रयत्न करायचे त्याने ठरविले. तो तेथेच चुळबुळत उभा राहून त्या माणसाची वाट पाहू लागला. परंतु तेथे तसे अधिक काळ थांबणे धोक्याचे होते. एखाद्या वाटसरूला वा पोलिसाला त्याचा संशय येण्याची शक्यता होती. उत्कंठेने त्याने पुन्हा एकदा घड्याळाकडे पाहिले. बरोबर एक वाजला होता. तो माणूस येण्याची हीच वेळ ठरली होती. एव्हाना यायलाच हवा होता तो. पण त्याचा तर पत्ता नव्हता.

जिरॉद्ने पूल ओलांडला. अजून कोणीच दिसत नव्हते. मग तो पुलाखाली जाऊन उभा राहिला. पुलावरून एक बैलगाडी खडखडत गेली. जिरॉदने डोके बाहेर काढन पुलावर नजर टाकली. अजून त्या माणसाचा पत्ता नव्हता. त्या माणसाला उशीर का झाला असावा याचा विचार करताना जिरॉद्च्या मनाची घालमेल होत होती. इतक्यात एक उंच माणूस पुलाकडे येताना जिरॉद्ला दिसला. त्याच्या हातात एक सूटकेस होती आणि त्याच हातात त्याने हॅट धरली होती. हा तर त्यांचा पूर्वनियोजित संकेत होता. एकूण सारे ठरल्याप्रमाणे पार पडते आहे तर, जिरॉद्ला वाटले. जिरॉद् पुन्हा पुलावर चढला आणि त्या उंच तरुण माणसामागून चालू लागला. ज्यावेळी ते पुलाच्या दुसऱ्या टोकाशी जाऊन पोचले त्यावेळी जिरॉद् चटकन् त्या माणसाजवळ जाऊन परवलीचा शब्द पुटपुटला.

त्या उंच माणसाने आपण काही ऐकले असे दाखवलेच नाही. परंतु आणखी दोन पावले चालून तो थांबला; त्याने सूटकेस खाली ठेवली; आणि तो सरळ तोंड फिरवून तडक उलटया दिशेने चालू लागला. जिरॉद्ने ती सूटकेस उचलली आणि स्कांदाव शहरात प्रवेश केला.

## पूर्वार्ध समाप्त

या महिनाअखेर
नवी दिल्ली येथे भारत सरकारच्या वतीने
जागतिक पुस्तक-जत्रा आयोजित करण्यात आली आहे.
' भारतीय पुस्तक-प्रकाशन व्यवसाय '

# नव्या आशा

**नंदकुमार रेगे**

'काय बुवा, आजकाल कितीतरी नवनवीन पुस्तके बाजारात येत आहेत. पण किंमती बघितल्या की छाती फाटून जाते बघ –'

' तेच कशाला ? लायब्ररीत क्लेम लावायचा झाला तरी पुस्तक हाती येईपर्यंत नवीन पुस्तके बाजारात आलेली असतात. वैताग आला आहे बघ नुसता –'

दोन कॉलेज युवकांचा ह्या संवाद मी लक्षपूर्वक ऐकत होतो. जो अनुभव या विद्यार्थ्यांना आला होता तसा तो अनेक विद्यार्थ्यांना येत असेल – माझ्या मनाला एक प्रश्न पडला – भारतात विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. केवळ जिल्ह्याच्याच नव्हे तर तालुक्याच्या आणि मोठमोठ्या गावीही महाविद्यालये निघू लागली आहेत. गेल्या आठदहा वर्षांच्या काळात विद्यार्थ्यांची संख्या कसकशी वाढत गेली त्याचे बोलके आकडे पाहिल्यास असे दिसून येते, की १९६० ते १९६९ या नऊ वर्षांच्या काळात ती ३५ दशलक्षांवरून ९९ दशलक्षांवर गेली. याचाच अर्थ निरक्षर भारत केवळ साक्षरच होत नसून तो सुविद्यही होत आहे. परतु आजकालचे शिक्षण हे शाळेच्या काय किंवा कॉलेजच्या काय, चार भिंतींच्या आत होणारे नाही. याचे कारण प्रत्यही ज्ञानाची क्षितिजे विस्तारत आहेत. आणि अभ्यासविषयांच्या कक्षा वाढत आहेत. त्यामुळे नवनवीन विषयांवरील पुस्तकांचे सातत्याने प्रकाशन होणे जरूर आहे. एवढेच नव्हे, तर ही पुस्तके सर्वसामान्यांच्या खिशाला परवडणारी हवीत. आज मात्र परिस्थिती याच्या उलट आहे. अगदी सर्वसामान्य पुस्तकांच्या किंमतीही भरमसाठ असतात. त्यातच काही काही प्रकाशक एकाच विषयावरील पुस्तके निरनिराळ्या शीर्षकाखाली प्रकाशित करून स्वतःची तुंबडी भरत आहेत. आणि एवढे सारे करूनही समाजात प्रतिष्ठितपणे मिरवीत आहेत.

सांगण्याचा मुद्दा असा, की सर्वसाधारण वाचकांची बौद्धिक भूक भागविण्या-

साठी आपल्याकडे जेवढे प्रयत्न व्हावयास हवे होते तेवढे आजवर झाले नव्हते. परंतु आता मात्र उशीराने का होईना, भारत सरकारला सुबुद्धी सुचली आणि त्या दिशेने गेल्या चारपाच वर्षांपासून उपाययोजना सुरू आहे.

भारत पुस्तक प्रकाशन व्यवसायास जोराची चालना देण्यासाठी भारत सरकारने १९६७ साली 'नॅशनल बुक डेव्हलपमेंट बोर्ड' स्थापन केले आहे. ह्या बोर्डाने ज्या महत्त्वपूर्ण शिफारसी केल्या आहेत त्यामध्ये प्रकाशकांच्या सहकारी संस्था स्थापन करणे, 'इंडियन नॅशनल बिब्लिऑग्रफीचे नियमित प्रकाशन करणे, भारतीय बनावटीचा कागद पुरवठा करण्याचे बाबतीत प्रकाशकांना प्राधान्य देणे, पुस्तक प्रकाशनासाठी वृत्तपत्रीय कागदाची आयात करणे, पुस्तक विक्रीच्या सोई उपलब्ध करणे आणि महत्त्वाचे म्हणजे वाचनालयांचे जाळे विणणे या होत.

केवळ या शिफारशी करून हे बोर्ड स्वस्थ बसलेले नाही. तर या शिफारसींवर आधारित काही विशिष्ट योजनाही करण्यात आली आहे. ही उपाय योजना म्हणजे १९७१–७२ सालापासून भारतीय प्रकाशकांना आयकरामध्ये वीस टक्क्यांपर्यंत सूट देणे, बँकांकडून त्यांना सढळपणे कर्जपुरवठा करणे, प्रकाशक आणि पुस्तक विक्रेते यांच्यासाठी फेडरेशन ऑफ पब्लिसिटी अँन्ड बुकसेलर्स असोसिएशन ऑफ इंडिया' या संस्थेमार्फत प्रशिक्षणाचे वर्ग चालविणे आणि आंतरराष्ट्रीय पुस्तक प्रदर्शनामध्ये भारताने वारंवार सहभागी व्हावे या होत! या दृष्टिकोनातून जानेवारीच्या २२ ते ३० तारखेपर्यंत नवी दिल्ली येथे भरणाऱ्या जागतिक पुस्तकजत्रेला फार महत्त्वाचे स्थान आहे.

या पुस्तक-जत्रेमध्ये अमेरिका, रशिया, ब्रिटन, फ्रान्स, जपान, प्रजासत्ताक जर्मनी, रूमानिया आणि न्यूझीलंड या देशांतील प्रकाशकांनी सहभागी व्हावयाचे कबूल केले आहे. 'युनेस्को'चा प्रकाशन विभागही या जत्रेत सहभागी होणार असून भारतीय प्रकाशकांनी इंग्रजी आणि इतर भाषांत प्रसिद्ध केलेली सर्वप्रकारची प्रकाशने ठेवण्यात येणार आहेत.

या पुस्तक जत्रेच्या काळात सबंध देशात 'पुस्तक सप्ताह' पाळण्यात येणार आहे. या पुस्तक जत्रेचा किंवा पुस्तक सप्ताहाचा उद्देश केवळ प्रकाशन व्यवसायाला उत्तेजन मिळावे हा नसून जनतेमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे हा आहे. यासाठीही नॅशनल बुक ट्रस्टने एक योजना आखली आहे.

## भारतीय पुस्तक व्यवसाय

इतर प्रगत देशांच्या मानाने भारतातील पुस्तक प्रकाशन व्यवसाय छोटा असला तरी भारतातील छोट्या मोठ्या प्रकाशकांची संख्या एक हजाराच्या घरात असून या व्यवसायांत अंदाजे १०० कोटी रुपयांचे भांडवल गुंतलेले आहे. अलीकडे बऱ्याच राज्यांनी क्रमिक पुस्तकांचे राष्ट्रीयकरण केल्यामुळे प्रकाशकांच्या हातातील हुकुमी असा ६० टक्के धंदा गेला असे सांगण्यात येते.

प्राथमिक आणि माध्यमिक शाळांच्या क्रमिक पुस्तकांचे राष्ट्रीयकरण झालेले असले तरी विश्वविद्यालयीन अभ्यासक्रमासाठी आजही परदेशातून पुस्तकांची आयात करावी लागते. उपलब्ध माहितीनुसार आतापर्यंत भारताने अमेरिका, ब्रिटन आणि रशिया या देशांशी केलेल्या सहकार्याच्या करारानुसार अमेरिकेकडून १,१८८ ब्रिटनकडून ४४० आणि रशियाकडून १५० क्रमिक पुस्तके आयात केली. या व्यतिरिक्त या करारानुसार भारतीय प्रकाशक भारतात अमेरिकन पुस्तकांचे पुनर्मुद्रण करतात. त्यासाठी त्यांना पी. एल्. ४८० खाली आर्थिक मदत दिली जाते. अशा प्रकारे पुनर्मुद्रित झालेली अमेरिकन पुस्तके मूळ किंमतीच्या एक पंचमांश किंमतीला विकण्यात येतात. यासाठी अमेरिकन लेखकांना रॉयल्टी देण्यात येते. मात्र या रॉयल्टीवर त्यांना ९० टक्के आयकर द्यावा लागतो. आतापर्यन्त भारताने अमेरिकन पुस्तकावर दीड लक्ष रुपयांची रॉयल्टी दिली आहे.

अमेरिकन शास्त्र आणि तंत्रविज्ञान या विषयांवरील क्रमिक पुस्तके प्रसिद्ध करण्यासाठी 'यूअेसेड' मार्फत चाळीस लक्ष डॉलर्सची रक्कम बाजूला काढण्यात आली आहे ही गोष्ट नमूद करण्यासारखी आहे.

अशा रीतीने पुस्तक प्रकाशन व्यवसायाला चालना देत असतानाच प्रकाशीत पुस्तके जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोहचावीत म्हणून भारताचे शिक्षण मंत्रालय आणि फेडरेशन ऑफ पब्लिशर्स आसोसिएशन ऑफ इंडिया' या संस्थेच्या सहकार्याने लौकरच 'नॅशनल एज्युकेशनल रिसोर्सेस सेंटर' उघडण्यात येत आहे. ह्या सेंटरमार्फत आयात करण्यात आलेल्या पुस्तकांचे पृथक्करण करण्यात येईल. तसेच विद्यार्थी, लेखक आणि प्रकाशक यांना विशिष्ट प्रकारचे पुस्तक कोठे उपलब्ध होईल, त्या पुस्तकाचा कॉपीराईट, रॉयल्टी आणि तत्संबंधी मार्गदर्शन करण्यात येईल. मागील पाच वर्षांच्या काळात प्रकाशित झालेल्या पुस्तकांचा हे केंद्र संग्रह करणार असल्याने या केंद्राचा संदर्भ ग्रंथालय म्हणून मोठा उपयोग होणार आहे.

अशाप्रकारे पुस्तक प्रकाशन व्यवसायाला चालना देण्यात येत असली तरी ती स्वस्त किंमतीत उपलब्ध झाली पाहिजेत हे एक आणि दुसरे म्हणजे वाचनालयांचे जाळे विणण्याचा संकल्प केवळ कागदोपत्रीच न राहाता तो प्रत्यक्षात उतरला पाहिजे.

भारतात एकंदर ५,६६,८७८ खेडी आहेत त्यापैकी फक्त २८,३१७ खेड्यात वाचनालये आहेत आणि यापैकी बहुसंख्य केवळ नाममात्र आहेत. हा निष्कर्ष एखाद्या विरोधी पक्षाच्या सभासदाने काढलेला नसून १९६५ मध्ये नियोजन मंडळाने देशातील ग्रंथालयांची पहाणी करण्यासाठी नेमलेल्या वर्किंग ग्रुपने काढला आहे. तेव्हा या दृष्टीने उपाययोजना करणे किती जरुरीचे आहे ते दिसून येईल.

□ □ □

वेडगळ समजुती फक्त अशिक्षित लोकांच्यातच असतात असे नाही.
'माझा भुताखेतांवर विश्वास नाही, पण मला बाई त्यांची भीती वाटते.'
एका सुशिक्षित फ्रेंच बाईचे हे मत. आणि बहुतेक सर्व लोक अशाच मताचे.

# अशा काही वेडगळ समजुती

संग्राहक : एस्. एच्. मराठे

लॉस एंजलिसच्या कोर्टात मोटार अपघाताची केस चालू असताना मोटर ड्रायव्हरने सांगितलं, की 'भर रस्त्यात मांजर आडवं जात होतं त्याला टाळण्याचा माझा प्रयत्न होता!' पण या काळ्या मांजराचा शाप टाळण्यात त्याने दुसऱ्या एका मोटरगाडीचा चोळामोळा केला!

अर्थात असा प्रकार तुमच्याबाबतीत व्हायचा नाही हे मी जाणून आहे. ती एक चेटकीण, काळ्या मांजराच्या रूपाने फिरत होती, असला वेडेपणा तुम्ही चालवून घेणार नाही. कारण असल्या गोष्टींवर विश्वास ठेवण्यासारखा वेडेपणा तो आणखी काय असणार?

पण का हो, परवा तुमचे मित्र बोलता बोलता शिंकले तेव्हा 'सत्य सत्य' तुम्ही म्हणालात ते कसं? आणि त्या दिवशी त्या गल्लीच्या नाक्यावर बाजूला शिडी लावली होती, तिच्या पलीकडून तुम्ही मुद्दाम गेलात ते का? तुम्ही शिडी-खालून जात नाही व १३ तारखेच्या शुक्रवारी भलता धोका कोणी पत्करावा? हो, आपल्या खिशात 'सशाचं पाऊल' असलं तर ते कुरवाळल्याखेरीज असले धोके कोणी पत्करावे? इडापिडा टळो म्हणून तुम्ही एवढं तरी करताच ना?

अशा शेकडो वेडगळ समजुती जगभर दिसतात. त्या केवळ गांवढळ लोकांत आहेत असं नव्हे; पण अनादि कालापासून व अशिक्षित, अर्धशिक्षित, सुशिक्षित अशा सर्व थरांत हे प्रकार अद्याप दिसतात. केवळ आपल्या देशातच नव्हे तर यूरप, इंग्लंड, अमेरिकेतही आजच्या सुधारलेल्या बुद्धिवादी लोकांतसुद्धा या वेडगळ समजुती आहेत!

असल्या थोतांडावर बिलकुल विश्वास न ठेवणारी मंडळी फार थोडी. त्या फ्रेंच बाई म्हणत होत्या, 'माझा भुताखेतांवर विश्वास नाही, पण बाई मला त्यांची भीती वाटते!' बहुतेक सर्व लोक अशाच प्रवृत्तीचे असतात.

अनेक सुप्रसिद्ध लोकांच्या गमती अशाच नमूद आहेत. डॉ. सॅम्युएल जॉन्सन तर वेडगळ समजुतींची टर उडवायचे. पण स्वारी फिरायला बाहेर पडली, की फुट-

पाटच्या प्रत्येक खांबाला हात लावल्याखेरीज पुढे जायची नाही. जर एखादा खांब चुकून राहिला तर साहेब मागे फिरे नि त्या खांबाला हात लावून पुढे जाई !

इंग्लंडचे राजे आठवे हेन्री आपल्या टेबलावर, काळ्या घोड्याचा खूर, पेपरवेट म्हणून ठेवीत. कारण त्यामुळे सर्व दुष्ट भूते पळून जात !

शेक्स्पीयर तर एका ४०० वर्षांच्या जुन्या पलंगावर झोपे, कारण तो पलंग सुलक्षणी होता !

कदाचित, सर्वत्र आढळणाऱ्या वेडगळ समजुती कशा निघाल्या ते तुम्हाला ज्ञात असेल म्हणून तुम्ही या वेडगळपणाला फाटा दिला असेल.

समजा, कोणाला शिंक आली, तर अनेक लोकांत निरनिराळे प्रवाद आहेत. ग्रीक व रोमन लोकांत अशी समजूत होती, की शिंकेबरोबर झटकन आत्माही कोणाचा बाहेर पडायचा ! असा भयंकर प्रकार टाळावा म्हणून ते पटकन म्हणत, 'देव (जुपिटर) तुमचं रक्षण करो.' आतासुद्धा अनेक लोकांत 'देव तुमचं भलं करो' म्हणतात. जर्मन लोक म्हणतात 'गेसुंडहाइट' आरोग्य असो. थोडक्यात आपण लोक पुराण्या लोकांच्या भीतीचा वारसा असा नकळत बजावीत असतो.

बहुतेक समजुतींच्या मुळाशी दुर्दैवाची भीती असते. सर्व वाईट गोष्टींत १३ आकडा फार वाईट नव्हे का? जीझसच्या अंतिम खान्यापासून (Last Supper) या आकड्याला अशुभ मानू लागले. त्या रात्री जीझस आपल्या १२ शिष्यांबरोबर जेवला. त्यात ज्यूडास इस्कारियट हा १३ वा गणला गेला.

परवा परवा मिशिगन स्टेटच्या (U. S. A.) ग्रँड रॅपिड्सच्या सिटी कमिशनने नवं अग्निशामक सदन बांधलं, आधीची १२ होती, तर ह्या सदनाचं नामाभिधान 'एंजिनधाम १४' असं ठेवलं !

हा १३ नंबर दुर्दैवी असल्याबद्दल तुम्हाला पुरावा हवा तर आहे बरं का. व्हिएन्ना शहरातली एक बातमी वाचा, १३ नंबरची ट्राम, आल्सरबाक गाझे रस्त्यावर १३ नंबरच्या घराजवळ थांबलेल्या मोटरवर आपटली. वेळ दुपारी १३ वाजता (आपला १ वाजता). त्या मोटरच्या लायसन्स प्लेटचे शेवटचे दोन आकडे १३ होते. या सर्वांत वरचढ म्हणजे जखमी झालेल्यांची संख्या पण १३ च !

भोजनाला बसायच्या टेबलाशी बसणारे लोक १३ नसावे ही खबरदारी प्रत्येक मालकीण घेत असते. कोणी म्हणतात, की असे १३ लोक जेवायला बसले तर वर्ष-भरात त्यापैकी कोणीतरी दगावायचे ! कोणी म्हणतात अशा १३ पैकी प्रथम जो उठेल त्याची शंभरी भरलीच समजावं !

उलटपक्षी १३ हा आकडा दुर्दैवाचा द्योतक नाही असे किती पुरावे दाखवू ? यूरोपातील सुप्रसिद्ध संगीत प्रवर्तक रिचर्ड वॅग्नर १३ हा आकडा शुभ मानी. तो १९१३ साली जन्मला. त्याने आपल्या आयुष्यात लिहिलेल्या संगीत ऑपेरांची संख्या १३ च आहे. त्याच्या नावाची अक्षरं सुद्धा पहा–RICHARD WAGNER १३ च आहेत !

युनायटेड स्टेट्सचं सील तर दुर्दैवी नाही ना पहा डॉलरच्या नोटेवर १३ तारे, १३ बार व गरूडाच्या डाव्या पज्यात पकडलेले बाणसुद्धा १३, व उजव्या पंजात पकडलेल्या फांदीला पानं १३ व ऑलिव्ह फळंही १३. या सीलातील अक्षरे (E PLURIBUS UNUM) पण १३ च !

जेव्हा कधी एखाद्या महिन्याच्या १३ व्या तारखेला शुक्रवार येतो तेव्हा तो दिवस फार वाईट समजतात. जीझस शुक्रवारी वारल्यामुळे सर्व जुने ख्रिश्चन लोक समजत की शुक्रवार म्हणजे कमनशिबी. आदिमानव अॅदम व ईव्हनें ते मनाईफळ खाल्ले तो दिवस शुक्रवारच असावा असं समजतात. प्रथम जगबूड झाली तो दिवसही शुक्रवारच. मग असं जर होतं तर मग शुक्रवार म्हटलं, की पूर्वी लोकांच्या अंगावर शहारे येत ते बरोबरच.

पण आपल्या जगप्रसिद्ध सफरीला कोलंबस निघाला तो वार शुक्रवारच ! बऱ्याच महिन्यांनी अत्यंत निराश परिस्थितीत त्याला अमेरिका दिसली ती शुक्रवारीच ! पिल्ग्रिम्स पोचले तो वार, जॉर्ज वॉशिंग्टनचा जन्म व अमेरिकेतील प्रसिद्ध दोन लढायांचे दिग्विजय शुक्रवारचेच ! म्हणजे शुक्रवार अगदी वाईट समजायला नको, नाही का ?

काही महिन्यांपूर्वी लंडनमध्ये, अंडी चोरण्यावरून एक साधा चोर पकडला गला, तो कसा ? माहीत आहे ? पुढे हा पळत होता, पोलीस पाठीशी. अशा पाठलागात या चोराच्या लक्षात आलं, की आपण पळता पळता भिंतीला लावलेल्या एका शिडीखालून पळालो. म्हणजे काही अनिष्ट होणार या भीतीने तो चोर पुन्हा त्या शिडीजवळ आला, नि तेथेच त्याला पोलिसांनी पकडलं. पण त्याला असं समाधान होतं, की एखादं जन्माचं दुर्दैव ओढवण्यापेक्षा, पोलिसांच्या हाती सापडलेलं बरं !

आता हे खरं की अशा शिडीखालून जायचं नि वरून काहीतरी पडून कपाळमोक्ष व्हायचा त्यापेक्षा शिडीच्या पलीकडून गेलं तर काय बिघडलं ?

कोठेतरी एखादं खोल रूतलेलं भीतीचं मूळ असतं. प्राचीन लोकांनी याही गोष्टीचा विचार केला होता. ते सांगत की त्रिकोण हे परमेश्वराचं पवित्र प्रतीक आहे. तर भिंतीला शिडी लावली की झालेल्या त्रिकोणातून जाणं म्हणजे परमेश्वराची अवज्ञाच. त्यामुळे मरणसुद्धा ओढवेल. काय पटतं की नाही ?

अशा वृथा भितीपासून नेपोलियनसारखा मोठा योद्धाही सुटला नव्हता. इटलीत युद्ध चालू असता त्याच्या तंबूत प्रिय जोसेफिनचा फोटो लावलेला होता व चुकून फोटोवर असलेला आरसा काही लागून फुटला, झालं स्वारीने भीती घेतली की माझी प्रियतमा मेली. तर आपल्या मनःशांतीसाठी स्वारीने परत पारीसपर्यंत प्रयाण केलं नि दिसलं काय ? जोसेफिनला काहीही झालेलं नव्हतं. ती ठणठणीत होती. फुटक्या आरशालासुद्धा प्राचीनांकडे अर्थ आहे. त्यांचा दृढविश्वास होता की, कुडीतून आत्मा बाहेर पडून भटकू शकतो. पाण्यात दिसणारी आपली अनेक

प्रतिबिंबं ही आत्म्याचीच प्रतिबिंबं. आता त्या पाण्यात दगड फेकून, किंवा इतर काही कृतीने ती प्रतिबिंबं मोडणं म्हणजेच आत्म्याच्या क्षणिक निवासाचा नाश करणं. म्हणजे असं करणाऱ्याला प्रायश्चित्त ठेवलेलच !

मीठ सांडणं हासुद्धा शतकानुशतकं अपशकून समजतात. शक्य आहे की पूर्वी केव्हा मीठ हा वस्तू फार किंमती व दुर्मिळ असेल. एका काळी ग्रीक व रोमन लोक, पैसा म्हणून मिठाचा देवाणघेवाण करीत. या मिठाच्या व्यवहारावरूनच SALARY हा शब्द झाला व "To Earn One s Salt" हा शब्दप्रयोग इंग्रजीत आला. आता इतका मौल्यवान पदार्थ सांडणं म्हणजे स्वतःवर अनर्थ ओढवून घेणं नव्हे काय ? त्या अंतिम खान्याचवेळीसुद्धा जूडासने मिठाचे भांडे उलटले म्हणजे सिद्धच झालं, की त्याचं कमनशीब !

एवढं हे मिठाचं पुराण जर तुम्हाला पटलं तर मीठ सांडू नका हे सांगायलाच नको. पण समजा चुकून सांडलंच तर आपल्या डाव्या खांद्यावरून २-४ चिमट्या मीठ मागे टाका. कारण ही सगळी दुष्ट भुतखेतं आपल्यामागेच असतात. त्यांना मीठ दिलं की ती शांत !

प्रेमप्रकरण व विवाह यांनासुद्धा या वेडगळ समजुतींचा अंकुश आहेच; पैकी काही लहान प्रांतात प्रचलित आहेत पण इतरही सर्वत्र पाळतात.

आफ्रिकेच्या डोंगरी लोकांत, मुलांना, आपल्याकडे आकर्षून घेण्यासाठी मुलींपाशी अनेक युक्त्या असतात. नकळत त्याच्या डोक्याला मागून स्पर्श करणं, निरुपयोगी ठरल्यास, ती पिवळे गार्टर लावते व कबुतराची लहान हाडं आपल्या कपड्यात ठेवते. ह्यापैकी कोणत्यातरी एकामुळे तो प्रियाराधन करीत येईलच अशी खात्री !

उलट एखाद्या मुलीने, जर मागणीच नाकारली तर ? तो हळूच तिला चकवून कासवाच्या पिलाची वाळलेली जीभ, तिच्या खोलीत लपवून ठेवतो. मग या जादूटोण्यामुळे तिला नकळत, त्याच्या प्रेमाने ती वेडीच होईल.

काही अरबी मुली निराळाच एक प्रयोग करतात. त्या मोती उगाळून त्याचा लेप आपल्या पापण्यांवर लावतात. नंतर आपल्या आवडीच्या मुलाकडे दृष्टिक्षेप करायचीच खोटी, की तो भाळलाच !

माहीत आहे का, की हिरा हे विवाह ठरल्याचे द्योतक कसं ठरलं ते ? हिऱ्याचं तेज हे प्रेमाच्या जादूने फाकू लागतं हा अपसमज काढून कसा आला कोण जाणे. पण त्यामुळेच हिरा प्रेमाचं प्रतीक ठरला. आता हल्लींच्या मुली मन चाहेल त्या रंगाचा खडा पसंत करतात साखरपुड्यासाठी. काय सांगावं अस्सल हिऱ्यापेक्षा काहीही हलका खडा घ्याल नि तुमच्या लग्नाचं तारू खडकावर फुटलं, तर कसं ? आपण बऱ्याच वेडगळ समजुती सांभाळून असाल तर, तुमच्या घराच्या दरवाज्यावर घोड्याचा नाल तर ठोकून ठेवाल, नपेक्षा सशाचं पाऊल खिशात संभाळाल. असा अंदाज आहे की १ कोटी अमेरिकन लोक सशाचं पाऊल संभाळतात !

शक्यता आहे की सशाची विलक्षण प्रजोत्पत्ती प्राचीनांच्या मनात भरली असेल व त्यातच काही दैवीशक्ती त्यांना दिसली असेल. त्यामुळे त्यांनी सशाला यश व समृद्धीचा द्योतक ठरविलं असावं. मग काय त्याचा एक पंजा संभाळायचा नि नेहमी त्याने आपली पाठ थोपटावी, की यश व समृद्धी भरपूर आलीच !

'ईडन बाग' निर्बंधित फळ चाखल्यामुळे ईव्हला स्वर्गातून खाली ढकललं तेव्हा तिच्या हातात ४ पानी डहाळी होती, तेव्हापासून हिरवी डिक्षी हे सुदैवाचं लक्षण झालं.

जिकडे तिकडे अशी समजूत आहे, की ज्यांच्या घराच्या दाराच्या चौकटीच्या पट्टीत नाल ठोकलेला आहे, त्यांचं सुदैव लवकरच उगवणार. पूर्वीच्या काळी आपल्या शेजाऱ्यांना सदिच्छेने म्हणत की तुमच्या घराच्या उंबरठ्यातला ठोकलेला नाल कधीही न निखळो.

काही लोक म्हणतात की, जीझस जन्मला तेव्हा त्या पागेत घोडा बांधलेला होता. म्हणून नाल हे सुदैवाचं प्रतीक समजलं जाऊ लागलं. पण त्यापेक्षा जास्त अशी कल्पना दिसते की नाल दिसतो काहीसा चंद्रकोरीसारखा. नि चंद्र तर भाग्यदायकच समजतात म्हणून नाल उंबरठ्यात असावा.

अर्थातच या सर्व वेडगळ समजुती म्हणजे शुद्ध अजागळपणा हे तुम्ही जाणताच. तरी पण तुम्ही या समजुतीना चिकटून असता. मग असं का हो ? कारण तुम्ही अगदीच माणूस आहात झालं ! व्यवहारात कोठे काही बिघडलं तर तर्कशुद्ध कारणापेक्षा असल्या अपशकुनामुळे तसं झालं असं समजून राहायला माणूस जास्त राजी असतो.

□ □ □

---

## निझर गावचा एक रहिवासी.... पृष्ठ १६ वरून

अमुक पट रक्कम भरून जुन्या शर्तीच्या करून घेण्याची सवलत मिळविण्यात आली व जुन्या शर्तीच्या जमिनीच्या विक्रीला परवानगी मिळाली. हे सर्व करवून घेतलं गेलं. आमच्या जमिनी जुन्या शर्तीच्या करा असे सांगायला कोणी आदिवासी गेला नव्हता. मग सावकारांनी, जमीनदारांनी पैसे भरून जमिनी जुन्या शर्तीच्या करून घेतल्या. हळूहळू त्या ताब्यातही घेतल्या. दिले दोनशे रुपये, दाखवले दोन हजार रुपये. अंगठे घेतले आंगठे. शेवटी एक दिवस त्याला आपली जमीन गेल्याचे कळले.

या भागात भूविकास बँकेतर्फे विहीर तगाईसाठी कर्ज आदिवासींना देऊन आदिवासींच्या जमिनींचे लिलाव करण्यात आले आहेत. विहिरीसाठी कर्ज मिळाली परंतु विहिरी हरवल्या आहेत. पैसे आदिवासींना मिळालेच नाहीत. पण जमिनी मात्र लिलावात गेल्या आहेत. भूविकास बँकेची प्रकरणे म्हणजे संशोधनाचा विषयच झाला आहे.

□ □ □

पृष्ठ ७ वरून

'टास्क फोर्स–७४' असे नाव देण्यात आले होते व मोहिमेचे नेतृत्व अर्थातच 'एंटरप्राईज'कडे होते.

मल्लक्काची सामुद्रधुनी (सिंगापूरजवळ) ओलांडून 'टास्क फोर्स–७४'ने बंगालच्या उपसागरात प्रवेश केल्याची बातमी येताच या बोटी जणू काय बांगला देश वा भारताच्या किनाऱ्याजवळ आल्या अशीच बहुतेकांची समजूत झाली. हे अंतर दोन अडीच हजार किलोमीटर्सपेक्षा थोडे जास्तच असेल, पण ती जहाजे आपल्या परसात आल्याप्रमाणे आपल्याला वाटले. अर्थातच संरक्षणाचा विचार करता आपण अतीव सावधानता बाळगणे आवश्यक असते व त्यादृष्टीने असेच वाटणे योग्य ठरेल.

'टास्क फोर्स' पुढे सरकत होता. अंदमान-निकोबारच्या जवळजवळ येत होता. भारत-पाक युद्धाला काय वळण लागणार, महायुद्धाची ठिणगी पडणार का असेही अनेकांना वाटले. खरे म्हणजे तशी अजिबात शक्यता नव्हती. पाकला दिलासा देणे व भारतावर दडपण आणणे यापेक्षा या मोहिमेला अधिक महत्त्व असेल असे मानायला मी तयार नाही. पण यातही चक्क शरणागती पत्करून पाक सैन्याने 'टास्क फोर्स ७४'चीच गती मंदावून टाकली. पुढले सारे नाटय, ननाटय ठरले.

सोव्हिएत युनियनही यात मागे नव्हती. सोव्हिएत जहाजेही सावलीप्रमाणे त्या जहाजांबरोबर होतीच. तशी ती सर्वच सागर-महासागरांवर सावलीप्रमाणे आहेत. दोन्ही राष्ट्रांची जहाजे एकमेकांवर बारीक लक्ष ठेवून आहेत. एकमेकांना सावली-प्रमाणे साथ देत आहेत. 'वॉशिंग्टन पोस्ट'च्या अँडरसन नावाच्या स्तंभलेखकाने आपल्या स्तंभात लिहिले आहे, की दिल्लीतील सोव्हिएत वकीलाने भारत सरकारला गुप्त आश्वासन दिले होते, की अमेरिकी जहाजे वा चिनी पाणबुड्यांचा बांगला देश प्रश्नावरून होणारा संभाव्य हस्तक्षेप हिंदी महासागरातील रशियन आरमार कदापी होऊ देणार नाही. हे खरे खोटे कसेही असो पण याच वेळी रशियन जहाजे अमेरिकी जहाजांच्या जवळपास होती खरी! (दोन्ही राष्ट्रांना हिंदी महासागर व इतरत्र वर्चस्व स्थापायचे आहे त्यासाठी हा सारा खटाटोप).

पाक शरणागतीमुळे अमेरिकन 'टास्क फोर्स–७४'मधील जहाजांच्या शिडातील हवाच निघून गेली म्हणून त्यांना मागे फिरण्याखेरीज दुसरे गत्यंतरच नव्हते. हे वार्तापत्र लिहीत असतानाची बातमी आहे, की बांगला देशच्या सागरी हद्दीपासून सुमारे १८०० किलोमीटर्स दूरवरून 'टास्क फोर्स ७४' सिलोनच्या दक्षिणेकडे शेकडो किलोमिटर्सवरून मालदीव बेटाजवळपास चालली आहे.

दुसरीही एक महत्त्वाची घटना घडली आहे. त्यामुळे शक्य तितक्या लवकरच

ही जहाजे पुन्हा टोन्किनच्या आखाताकडे वेगाने जातील असे लक्षण दिसत आहे. लाओसमधील अत्यंत महत्त्वाचे असे जार्सचे पठार व्हिएतकाँग व पॅथेलाओ या साम्यवादी सैनिकांच्या हाती पडले आहे. ते मिळविण्यासाठी लाओसचे व अमेरिकेचे सैन्य निकराचा प्रयत्न करणार व यासाठी 'टास्क फोर्स' मधील जहाजे पुन्हा तेथे जाणे महत्त्वाचे आहे.

युद्धशास्त्राच्या अभ्यासात इतिहास-भूगोलाचे महत्त्व फार असते. पश्चिम प्रशांत महासागरात सातव्या आरमारी काफिल्याचे अस्तित्व ऐतिहासिक व भौगोलिक दृष्टचा मोठे आहे.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात युद्धपिपासू जपानविरुद्ध लष्करी व नाविक कारवाईसाठी सातव्या आरमारी काफिल्याची १९४३ साली स्थापना झाली. सर्वच दृष्टीने ते अत्यंत प्रबळ होते. अमेरिका युद्धात पडायला जपानी आरमाराचा पर्ल हार्बरवरील हल्लाच कारणीभूत झाला होता. त्यामुळे जपानच्या दारातच ही शक्ती उभी करण्यात आली. युद्ध संपले तरीही अमेरिकेने हा काफिला तेथेच ठेवला. कारण आग्नेय आशियात साम्यवादाचा प्रसार होईल अशी अमेरिकेला भीती वाटत होती. दुसरे महायुद्ध संपता संपता रशिया-अमेरिका या 'दोस्त राष्ट्रां'तील सबंधही बिघडत चालले होते. त्यातच साम्यवादी चीनचा उदय झाला. त्या भागात हे दुसरे लाल संकट उभे ठाकले. त्या मागोमाग कोरियात युद्ध सुरू झाले आणि अमेरिका त्यात गुंतत गेली. 'जगाचा पोलीस' अशी भूमिका अमेरिकेने घेतली. इंडोचीनमधून फ्रेंचांनी माघार घेतली व ती जागा अमेरिकेने घेतली. ही भूमिका पार पाडतानाही अमेरिकेला सातवा आरमारी काफिला मोलाचा वाटतो.

आता युद्धशास्त्र जरी फारच प्रगत झालेलं असलं आणि बटणे दाबताच अमेरिकन वा रशियन भूमीवरून अण्वस्त्रे सोडणे शक्य असले तरी दोन्ही राष्ट्रे आपापली शक्ती एकमेकांच्या भूमीच्या अधिक जवळ सज्ज ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत. ६२ साली रशियाचे प्रधानमंत्री निकिता ऋश्चेव्ह यांनी अमेरिकेजवळ क्यूबात आपले अण्वस्त्र तळ उभारण्याचा प्रयत्न केला व त्यातूनच क्यूबाची नाकेबंदी घडून आली व दोन बड्या राष्ट्रांच्या तणाव्यामुळे जागतिक अण्वस्त्र युद्धाची शक्यता निर्माण झाली होती. पण दोन्ही राष्ट्रांनी माघार घेतला. अण्वस्त्रसज्ज सातवे आरमार याच प्रकारच्या कामासाठी रशिया-चीनच्या छाताडावर तोफा रोखून आहे.

कोरियन युद्धानंतर, १९५७ साली अमेरिकेच्या नवीन डावपेच व योजनांनुसार सातव्या आरमारात तिसऱ्या मरीन डिव्हिजनची व पहिल्या मरीन विंगची भर टाकण्यात आली. ६१ सालापासून सातव्या आरमाराने व्हिएतनामी युद्धात भाग घ्यायला सुरुवात केली. याच युद्धात अमेरिका जशी अधिकाधिक गुंतू लागली तशी सातव्या आरमाराची शक्ती वाढविण्यात येऊ लागली. ६७ सालापासून त्यात १७५

युद्धनौका आणि त्यांना साहाय्य करणारी अनेक साहाय्यक जहाजे होती. त्यात, विमानवाहू नौका, टॉर्पेडोवाहू विनाशिका, पाणबुड्या, लॅन्डिंग क्राफ्टस्, (किनाऱ्यावर नौसैनिक उतरविण्याकरिता यांचा उपयोग होतो.) ६०० विमाने (यांत अण्वस्त्रे वाहून नेणाऱ्या विमानांचा समावेश होता) व काही हजार नौसैनिक एवढी शक्ती तेथे ओतली.

सातव्या आरमाराचे पाच विभाग आहेत. आग्नेय आशिया करारातील राष्ट्रांच्या निरनिराळ्या तळांवर त्यांचे वास्तव्य असते त्यापैकी पुढील काही तळ महत्वाचे आहेत. ओकिनावा बेटावरील नाहा, याकोसुमा व ससेबो हे तळ जपानमधील आहेत. तर सुबिकचा उपसागर (फिलिपिन्स), इंडोनमचोधील दानांग, फुबै, चुलाई, काम्पन, बिलन होआ आणि हाँगकाँग हे तळ यात मोडतात. इंडोचीनमध्ये चालू असलेल्या युद्धात शत्रुप्रदेशांवर हवाई हल्ले करणे, त्यांची सागरी नाकेबंदी करणे वगैरे कामे सातवा आरमारी काफिला करतो.

शत्रुपक्षाची वाहतूक यंत्रणा, कारखाने, रेल्वे व इतर महत्त्वाचे उद्योगधंदे यांच्यावर हल्ला करून त्यांची आर्थिक व्यवस्था डबघाईला आणायची असाही प्रयत्न हा काफिला सातत्याने करीत आहे, हवाई प्रॉजेक्टाईल्स, नापाम बॉम्बस (हे भयानक बॉम्बस् आहेत. यातून निर्माण होणाऱ्या प्रचंड उष्णतेमुळे सजीवांच्या अंगाची लाहीलाही होते. ६५ च्या त्र यावेळच्या युद्धात पंजाब, काश्मीरमध्ये पाकने या बॉम्बस्चा उपयोग केला होता.) निरनिराळ्या विषारी वा झोप आणणाऱ्या रसायनांचाही वापर या काफिल्यातील विमाने शत्रूविरुद्ध करीत असतात. 'वाशिंग्टन पोस्ट' या अमेरिकन दैनिकाने म्हटले होते, की यावर्षी एका दिवसात या विमानांनी ३०० हल्ले केले. 'एंटरप्राईज' विमानवाहू नौका सातव्या आरमारात दाखल झाल्यानंतरच्या पहिल्या सहा महिन्यात या नौकेवरील विमानांनी १३ हजारापेक्षा अधिक हवाई हल्ले इंडोचीनमध्ये केले. रात्रंदिवस हे हवाई हल्ले आणि युद्धनौकांवरून किनारपट्टीवर तोफांचा भडीमार चालूच असतो. काफिल्यातील हेलिकॉप्टर्सवर २० मिलिमीटर आकाराच्या तोफा असून त्याही अहोरात्र आग ओकीत असतात. प्रत्येक जहाज हे कोणत्याही क्षणी कोणत्याही कामगिरीवर जायला पूर्णपणे सज्ज असते. पेंटॅगॉनचे प्रमुख श्री. मेलविन लेअर्ड (म्हणजे अमेरिकेचे संरक्षणमंत्री पेंटॅगॉन म्हणजे संरक्षण खाते. या खात्याच्या कचेऱ्या असलेल्या इमारती पंचकोनी आकारात असल्याने त्यांना पेंटॅगॉन असे म्हणतात.) यांनी जाहीरपणे म्हटले आहे, की अनंत काळपर्यंत अमेरिकेची आरमारी व हवाई शक्ती आशियात रहाणार आहे. अर्थातच हा संदर्भ ७ व्या आरमारी काफिल्याबाबतच होता. हिंदी महासागरावर वर्चस्व असणे म्हणजे व्यापारी सागरी मार्ग आणि या विभागातील अविकसित व विकसनशील देश यांच्यावर वर्चस्व वा दबाव निर्माण करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे हाच यामागचा उद्देश आहे.

सातव्या आरमारी काफिल्याचा विषय इथे आलाच आहे तेंव्हा त्यानिमित्ताने बड्या राष्ट्रांची सर्वच ठिकाणी जी सत्तास्पर्धा चालू आहे त्यादृष्टीने त्यांचे नाविक सामर्थ्य कसे आहे हे पाहणे महत्वाचे ठरेल.

एकेकाळी ब्रिटन ' सागर-सम्राज्ञी ' या थाटात मिरवत होते. दुसऱ्या महायुद्धाने ब्रिटनला असा जबरदस्त हादरा दिला, की त्यातून ते राष्ट्र अजूनही सावरू शकलेले नाही. सागरावरील ब्रिटनची सद्दी संपली आणि अमेरिकेने ती जागा घेतली.

दुसरे महायुद्ध संपले तेंव्हा अमेरिका हेच सर्व दृष्टीने बलाढ्य राष्ट्र होते. त्याचे नाविक सामर्थ्य ६८,९३६ बोटी इतके होते. यात ९९ विमानवाहू नौका, २३ युद्धनौका, ७३ क्रुझर्स, ७३७ विनाशिका, २३४ पाणबुड्या व इतर अनेक छोट्या मोठ्या बोटी होत्या. याच वेळी हवाई शक्तीचे सामर्थ्यही वाढले होते आणि थोड्या विमानांच्या सहाय्याने प्रचंड प्रमाणात असलेल्या नाविक शक्तीपेक्षाही अधिक काम करणे शक्य होते. असा विचारप्रवाह अमेरिकेत सुरू झाला आणि मग नाविक वाढीला कात्री लागली. दुसऱ्या महायुद्धात अनेक अमेरिकन युद्धनौकांवर एकही तोफेचा गोळा डागण्याची वेळ आली नाही. हेही इथे लक्षात घेण्यात आलं. पुढे कोरियन युद्धात व इतरत्रही अमेरिकेची अत्याधुनिक जहाजे कामगिरी बजावितच होती.

सध्या अमेरिकन आरमारात ८००००० नौसैनिक असून १०२५ एवढी जहाजे आहेत. यात २१ विमानवाहू नौका, १५४ पाणबुड्या, १०९ ॲम्फिबियस जहाजे, ११ क्रुझर्स, ३० फ्रिगेटस्, १७० विनाशिका व इतर अनेक प्रकारची जहाजे येतात. (हा सर्व ताळेबंद देत बसलो तर ती एक भलीमोठी यादी होईल.)

अमेरिकन आरमाराचे चार विभाग आहेत. त्यापैकी पहिला आरमारी काफिला पूर्व प्रशांत महासागरात आहे, दुसरा काफिला ॲटलांटिकमध्ये आहे तर सहावा काफिला भूमध्य समुद्रात आहे. सातव्या काफिल्याचे सविस्तर वर्णन वर आलेले आहेच.


विमानवाहू नौकात १५ हल्ला करण्यायोग्य आहेत, या प्रत्येक नौकेवर सुमारे ८० ते १०० विमाने असतात. टेहळणी विमाने, छोट्या व लांब पल्ल्याच्या हल्ल्याची बॉम्बर्स, फायटर्स, कॉप्टर्स, तेलपुरवठा इत्यादी विमानांची त्यावर पथके आहेत. १५४ पैकी २०पाणबुड्या अणुशक्तीवर चालणाऱ्या, हल्ल्यास उपयुक्त अशा आहेत. पोलरिस नावाच्या बऱ्याच अण्वस्त्रसज्ज पाणबुड्याही या १५४ मध्ये आहेत. युद्धनौकांपैकी २९३ पाणबुडीविरोधी आहेत. २९ गायडेड मिझाईल्स सोडणाऱ्या विनाशिका आहेत. नौसैनिकांपैकी ३०२००० मरीन कोअरचे आहेत. यांच्या चार मरीन डिव्हिजन्स व तीन एअर विंग्ज डिव्हिजन्स आहेत. यात १२०० लढाऊ विमाने आहेत. रशिया-चीन या देशांपेक्षा सामर्थ्यवान असणे व ' जगाचा रखवालदार ' ही अमेरिकेची भूमिका आहे. पण गेल्या दहा वर्षांत रशियाने अनेक

बाबतीत नाविक शक्तीत अमेरिकेवर ताण केली आहे त्यामुळे पाश्चात्य राष्ट्रात अस्वस्थता आहे.

सोव्हिएत युनियनची नाविक शक्ती जरी वाढली असली तरी या राष्ट्राला भौगोलिकदृष्ट्या बऱ्याच अडीअडचणींना तोंड द्यावे लागत आहे. चार ठिकाणी किनारपट्टी आहे. त्यापैकी दोन ठिकाणी त्यांच्या सागरीहद्दी भूभागाने घेरलेल्या आहेत. त्यातून बाहेर जाणारे मार्ग अत्यंत चिंचोळे आहेत आणि त्यामार्गांवर इतर राष्ट्रांचे पारंपारिक वर्चस्व आहे. उरलेले दोन मार्ग खुल्या समुद्रावर आहेत. पण या भागातील तळ व बदरे अनेक महिने बर्फाच्छादित असतात. रशिया हा देश पूर्वीपासूनच 'लॅन्ड पॉवर' समजला जात असे. कारण रशियाचा भूभागही तसाच मोठा आहे पण दुसऱ्या महायुद्धानंतर हे चित्र पालटू लागले. सोव्हिएत आरमाराचे सर्वांत मोठे वैशिष्टय म्हणजे पाणबुड्यांचा प्रचंड ताफा. एवढा मोठा ताफा जगातील कोणत्याही राष्ट्राकडे नाही. खुल्या समुद्रावरीलही त्यांची शक्ती वाढते आहे. सोव्हिएत युनियनच्या व्यापारी जहाजांचा तांडाही जगात सर्वांत मोठा आहे. भूमध्य समुद्र व इतर सागरांवर सोव्हिएत जहाजांचा संचार अत्यंत प्रभावी आहे.

अमेरिकेबरोबर युद्ध झाले तर त्यात पूर्ण विजय मिळविता आला पाहिजे या उद्दिष्टानेच रशिया आरमाराची शक्ती वाढवीत आहे. याच शक्तीद्वारे जगावर साम्यवादी विचारसरणीचे वर्चस्व प्रस्थापू शकू असेही रशियाला वाटते. यासंबंधी रशियन दर्यासारंग ग्रोझकोव्ह म्हणाले होते, की रशियाचा ध्वज आता जगातील सर्वच खुल्या समुद्रावर दिमाखाने वावरतो आहे. अमेरिका हे राष्ट्र समुद्राची स्वामिनी नसल्याचे कालांतराने अमेरिकेच्या लक्षात येईलच. सोव्हिएत संरक्षणमंत्री मार्शल मालिनोव्हस्की त्यांच्या मृत्यूपूर्वी थोडे दिवस आधी म्हणाले होते, की सोव्हिएत युनियनचे आरमार राजकीय व लष्करी दोन्ही प्रकारच्या कार्यासाठी व साम्राज्यवाद्यांच्या जोखडातून अनेक राष्ट्रांना मुक्त करण्यासाठी कटिबद्ध आहे. तेव्हा याच मार्गाने सोव्हिएत आरमाराची प्रगती चालू आहे.

सोव्हिएत आरमाराची खरी शक्ती त्यांच्या पाणबुड्यांच्या ताफ्यात आहे. त्यात २५० हल्ल्यास योग्य अशा व १०० अस्त्रे सोडणाऱ्या आहेत. समुद्रतळापासून ८०० मैल दूर पल्ल्यापर्यंत ही अस्त्रे सोडता येण्याची त्यांच्यात कुवत आहे. 'क्रेस्ता' क्लास क्रुझर्स व 'क्यांदा' क्लास विनाशिका सोव्हिएत आरमारापाशी असून त्यावरून, समुद्रावरून समुद्रावर त्याचप्रमाणे समुद्रावरून आकाशात अस्त्रे सोडू शकतात. 'ओसा' व 'कोमार' या टेहळणी बोटी जवळच्या पल्ल्याची अस्त्रे सोडू शकतात. ही शक्ती झाली, पण छोटी जहाजे आर्थिकदृष्टयाही परवडणारी आहेत. भूमध्य समुद्रात त्यांनी अमेरिकेच्या तोंडचे पाणी पळविले आहे. पाणबुड्यांना छत्र देणारी जहाजे, बर्फ फोडणारी, सुरुंग हुडकून काढणारी आणि इलेक्ट्रॉनिक्सच्या साहाय्याने हेरगिरी करणारी वगैरे अनेक प्रकारची जहाजे आहेत. मात्र सोव्हिएत



नवे प्रकाशन
संध्याकाळ

गजानन जागीरदार
यांच्या
चाळीस वर्षांच्या
चित्रजीवनाची
वाटचाल

**संध्याकाळ**

किंमत : दहा रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव
पुणे ३०

नौदलात विमानवाहू नौका नाहीत त्याऐवजी लांब पल्ल्याची, जमिनीवरून उडणारी टेहळणी विमाने हे त्यांचे काम भागवतात.

सुमारे ६३ साली रशियाची तीन ते चार जहाजे भूमध्य समुद्रात होती. ६७ साली त्यांची संख्या १० ते १२ झाली. आता ती सुमारे ४० एवढी आहे. याच शक्तीच्या जोरावर रशिया, इजिप्त, सिरिया व त्या भागातील इतर काही राष्ट्रांवर आपला प्रभाव टाकून आहेत. ग्रीसमधील यादवीयुद्धात हस्तक्षेप करणे वा दबाव आणणे आता रशियाला सहज शक्य आहे. शिवाय भूमध्यसमुद्रातील अमेरिकेच्या सहाव्या आरमाराला शह देणारा काफिला असाही त्यांचा हेतू होत आहेच. सोमालिया, इजिप्त, अल्जिरिया, येमेन, सुदान या देशात त्यांना काही सवलती मिळत असून त्याद्वारे हा काफिला तांबडा समुद्र व अरबी समुद्र यांवर वर्चस्व ठेवू शकेल. सोव्हिएटचे प्रशांत महासागरी आरमार त्या सागराप्रमाणेच हिंदी महासागरावरही प्रभावी ठरत आहे. असे म्हणतात, की सध्या सोव्हिएट युनियन भारताला जी लष्करी मदत देत आहे त्याचा उपयोग करून भारतावर दडपण आणून हिंदी महासागरावरील अत्यंत महत्वाचे स्थान असलेल्या अंदमान व निकोबार बेटांचा तळ म्हणून उपयोग करून घेण्याचा रशियाचा मानस आहे.

सध्या सोव्हिएत आरमाराचे पुढील प्रमाणे विभाग आहेत. 'उत्तरेकडील आरमारी तांडा' 'बाल्टिक तांडा,' 'काळा समुद्र तांडा' आणि प्रशांत महासागर तांडा. त्यांचा उत्तरेकडील तांडाच खऱ्या अर्थाने खुल्या सागरावर आहे. भौगोलिक अडचणींवर मात करण्याकरिता रशियाने अनेक गोष्टींचे साहाय्य घेतले आहे. आणि रशियन आरमार आता बंदरात राहण्यापेक्षा अनंत काळ समुद्रावरच राहते. सोव्हिएत आरमार व आरमारी विमानदलात एकूण ४,६५००० सैनिक आहेत. संपूर्ण नौदलाचे टनांमधील जागतिक स्थान दुसऱ्या क्रमांकाचे आहे. रशियाकडे निरनिराळ्या प्रकारची सुमारे १४०० जहाजे आहेत.

जाताजाता चिनी व भारतीय आरमाराचा उल्लेख करायला हरकत नाही. चिनी नौदलात १,५०,००० सैनिक आहेत. एक 'जी क्लास पाणबुडी.' हीला (बॅलास्टिक मिझाईल ट्यूबस् आहेत) २९ पाणबुड्यांचा समुद्रसंचारी तांडा. ३ पाणबुड्या किनारपट्टीचे रक्षण करतात. ४ विनाशिका, त्यांची ९ संरक्षक जहाजे, २४ पाणबुड्यांचा पाठलाग करणारी जहाजे, १५ टेहळणी जहाजे, ५० पाणसुरुंग हुडकून काढणारी जहाजे व इतर काहीप्रकारची जहाजे आहेत. त्याच्या आरमाराचे पूर्व विभाग, दक्षिण समुद्र विभाग व उत्तर विभाग असे भाग आहेत.

भारताच्या आरमाराचे पूर्व व पश्चिम असे दोन तांडे आहेत. त्यात एक विमानवाहू नौका सुमारे सहा पाणबुड्या, सात विनाशिका, तीन विमानविरोधी फ्रिगेटस्, पाच पाणबुडी विरोधी फ्रिगेटस्, दोन क्रूझर्स, चार पाणसुरुंग शोधणारी जहाजे आणि सुमारे ५० सी हॉक जातीची लढाऊ विमाने व १२ अलिझे जातीची

टेहळणी विमाने व इतर काही प्रकारची जहाजे यांचा समावेश आहे. अलीकडच यात काही मोलाची भर पडली आहे.

आम्ही महाराष्ट्रीय खरे दर्यासारंग. कान्होजी आंग्रे यांचा वारसा सांगणारे. पण महाराष्ट्राच्या किनारपट्टीतील किती लोक नौदलात आहेत ? कान्होजी आंग्रे कोण होते इथूनही आमची सुरुवात होऊ शकेल.

लेखाचा शेवट करताना एक महत्वाचा मुद्दा मांडतो. परवाचे भारत पाक युद्ध सुरू असताना सिलोनने संयुक्त राष्ट्र संघात एक प्रस्ताव मांडला होता. हिंदी महासागर विभाग हा शांतता विभाग म्हणून यूनोने जाहीर करावा असा त्याचा मतितार्थ होता. सर्वच बडी राष्ट्रे यावर तटस्थ राहिली. कारण प्रत्येकाला येथे वर्चस्व पाहिजे आहे. त्यासाठी प्रत्येक बडे राष्ट्र कसेही दडपण आणील. मधाची बोटे लावील. त्यांच्या मोहाला बळी पडता कामा नये. नाहीतर त्यांच्या झगड्यात आपले स्वातंत्र्यच धोक्यात यायचे. 'टास्क फोर्स ७४'ने हेच दाखवून दिले आहे.

□ □ □

## मुंबई वार्ता

पृष्ठ ५ वरून

काँग्रेस या गोष्टीचा फायदा उठविणारच. एका वर्षानंतर निवडणुका झाल्या असत्या तर लोकांचा विजयाचा उत्साह ओसरला असता. नवे आर्थिक प्रश्न दिसू लागले असते आणि विरोधी पक्षांना बोलायला विषय मिळाले असते. आता त्यांची भलतीच आफत आली आहे. सत्ता बळकट करण्यासाठी नवकाँग्रेस राष्ट्रीय भावनेचा गैरफायदा घेत असल्याचे आरोप विरोधी पक्ष करीत आहेत ते यामुळेच.

मुख्यमंत्री वसंतराव नाईकांनी परवाच विरोधी पक्ष नेत्यांची बैठक घेतली होती. निवडणुकीचा विषय निघालाच. त्यावेळी विरोधी पक्ष नेत्यांनी हा आरोप केला. ते म्हणाले निवडणुकांमुळे सध्याचे जे एकजुटीचे वातावरण टिकणार नाही हे लक्षात घ्या. आम्हाला तुमच्यावर टीका करावी लागेल, तुमचे बुरखे फाडावे लागतील. त्यावेळी आम्ही राष्ट्रविरोधी भूमिका घेतो असे आरोप करू नका. 'म्हणजे आम्ही निवडणुकीला घाबरतो असे नाही हो – पण बघा. त्याचे असे परिणाम होतील हे लक्षात ठेवा.'

ही भाषणे ऐकल्यावर मुख्यमंत्री नाईक खो खो हसले की नाही हे आपल्याला नक्की माहीत नाही. आपण मात्र हे वाचल्यावर पोट धर धरून हसलो. नाईक निदान मनातल्या मनात तरी हसले असतील !

□ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH 649



पाकिस्तानात सत्तांतर
याह्याच्या जागी भूत्तो